
पुणे, किशोर–वर्ष ५३, अंक ४ था, एप्रिल २०२४ (मासिक) – किंमत रु.७/– पृष्ठे–५२.
Pune, Kishor - Vol.53, Issue 4, April, 2024 ( Monthly ) - Rs. 7 /- Pages -52

# किशोर

एप्रिल २०२४





# वंदना

विष्णू सोळंके

भिमराया आम्ही करतो, रोज तुझी वंदना
शोषितांच्या आसवांची हीच आहे प्रार्थना
धम्म झाला आमचा तू, वेद झाला आमचा तू
मूक साऱ्या भावनांची, तूच आहे वंदना ।।

सुख सारे दारात आले हसली अमुची मने
वंचितांच्या वेदनेची तूच सारी अर्चना
पंचाशिलाची पताका तूच दिली रे आम्हा !
शिका, संघर्ष करा हा मंत्र झाला जीवना ।।

बंधनातून मुक्त केले पाखरांना तू भिमा,
त्या निळ्या पाखरांची आज सारी वंदना ।
'वाचाल तर वाचाल' हा मंत्र साऱ्यांना दिला
ज्ञानसूर्या तूच झाला, पामरांची प्रार्थना ।।

संपर्क : ७०२०३००८२४

# किशोर

एप्रिल २०२४, वर्ष ५३ वे, अंक ४ था, फाल्गुन-चैत्र, शके १९४५-४६

- **संपादक :** कृष्णकुमार पाटील, संचालक महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
- **प्रकाशक :** विवेक उत्तम गोसावी नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, प्रभादेवी, मुंबई
- **निर्मिती अधिकारी :** हेमंत बाबर
- **अक्षरजुळणी :** किशोर विभाग
- **कार्यकारी संपादक :** किरण केंद्रे
- **वितरण व्यवस्थापक :** जालिंदर पाटील
- **मुखपृष्ठ-फोटो पेंटींग** सी. आर. शेलारे संपर्क : ९४२३०३००६२
- **चित्रांकन :** घनश्याम देशमुख, माईंडईट संवाद, धनश्री केळकर, राजेंद्र गिरधारी, अजय विभुते, गणेश ढवळे, बुद्धभूषण, योगिता धोटे,


## अंतरंग


| | | |
|---|---|---|
| वंदना | विष्णू सोळंके | ०२ |
| परीक्षेची मज्जा | डॉ.उर्जिता कुलकर्णी | ०६ |
| अवतरले महात्मा फुले | प्रशांत वाघ | ०९ |
| चला चित्र रंगवूया | धनश्री केळकर | १० |
| सजीवांच्या पाणी पिण्याच्या पद्धती | शशिकांत काळे | ११ |
| अप्पलपोट्या ढोलूराम | मुकुंद टाकसाळे | १२ |
| उन्हाळा दारात येईल गं... | फारुक एस.काझी | १५ |
| यांनी मला घडवले | मोगल जाधव | १६ |
| वसंतोत्सव | नीलकृष्ण देशपांडे | १९ |
| प्रयोग | डॉ.पंडित विद्यासागर | २० |
| डबल डेकरचा निखळ आनंद | पीयुष सेखसरिया | २२ |
| राजा आणि ढोल (लोककथा) | अनु.माधुरी दीक्षित | २४ |
| झुमके | नंदिनी कदम | २६ |
| आकाशातली बाग | राजन पोळ | २९ |
| काश्मिरी वृद्धाचे बुद्धीचातुर्य | रामकृष्ण अघोर | ३० |
| हनुवटीवरील व्रण | प्रसन्न दाभोलकर | ३२ |
| या मायभूच्या मुलांनो | ज्ञानेश्वर शिंदे | ३७ |
| कुतूहल | अमित डहाणे | ३८ |
| **बालविभाग** | | |
| भावी आधारस्तंभ | | ४० |
| उमलती प्रतिभा | | ४२ |
| चित्रकथा | घनश्याम देशमुख | ४४ |
| बोकोबाची ऐशी तैशी | राजेंद्र झुंजारराव | ४६ |
| **ENGLISH SECTION** | | |
| Rhyme Time-Fun Prime | Archana Sambarkar | ४७ |
| The Magic Book | Dr.Rasika V.Thosar | ४८ |
| Funny Puzzle | | ५० |



ऑनलाईन वर्गणीकरिता : www.kishor.ebalbharati.in

वार्षिक वर्गणीची रक्कम रु.८०/- मनिऑर्डर अथवा कोणत्याही राष्ट्रीयीकृत बँकेच्या पुणे शाखेवरील डिमांड ड्राफ्टद्वारे संचालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळ, या नावाने खाली नमूद केलेल्या पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावी. धनादेश स्वीकारला जाणार नाही.

**पत्रव्यवहाराचा पत्ताः कार्यकारी संपादक, किशोर, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,** सेनापती बापट मार्ग, पुणे- ४११००४ संपादकीय : ०२०- २५७१६१०७, वितरण व तक्रार : ०२०-२५७१६२४४

ई-मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in

किशोर येता आमच्या शाळा
हातात घेऊनी होतो गोळा
वाचावया कविता, कथा नि कोडी
उसंत मिळताच शाळेत थोडी

मित्र– सखा – दोस्त तू यार
आवडणारा आम्हांस फार
या साहित्यातून मिळवू ज्ञान
अखंड ठेवून मैत्री छान

येतोस जेव्हा तू भेटाया
आम्ही सज्ज स्वागताला
किशोर लागला आम्हां लळा
येणार थोडाच तुझा कंटाळा !


**मिलिंद जाधव**
जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळा (कन्या) भोकर,
जिल्हा–नांदेड








## हितगुज

# अभ्यास कौशल्यांचा विकास

किशोर मित्रमैत्रिणींनो...

परीक्षा जवळ आल्या की, तुमचे आई –बाबा, ताई–दादा, नातेवाईक, शिक्षक हे सर्व जण तुम्हांला सतत सांगत असतात 'अभ्यासाला बसा'.. किंवा विचारत असतात 'अभ्यास झाला का ?' 'किती झाला ?' या सर्वांच्या विचारण्याला आणि त्यांच्या प्रश्नांना उत्तर द्यायला कधी कधी तुम्ही कंटाळता देखील. पण तुम्ही तरी काय करणार.. कारण, परीक्षा आता अगदी तुमच्या दाराशी येऊन ठेपलेली असते. अशा वेळी तुमच्या मनात सतत परीक्षा.. परीक्षा.. अभ्यास.. अभ्यास.. असा जप सुरू होतो ना ?

'किशोर मित्रमैत्रिणींनो, अभ्यास... अभ्यास म्हणतात तो म्हणजे नेमकं काय हो?' 'पाटी–पुस्तक घेऊन शांत जागी बसणे का?' 'तर नाही! अभ्यास म्हणजे श्रवण, वाचन, लेखन, टिपण, स्मरण, विचार अथवा मनन, चित्रकृती रेखाटन, एकाग्रता आदी विविध कौशल्यांचा विकास करणे. ही कौशल्ये भीती न बाळगता, आत्मविश्वासपूर्वक सहजपणे वापरता येणे! आणि परीक्षा.. परीक्षा म्हणतात ती म्हणजे नेमके काय हो? धड्यांच्या खाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे पाठ करून लिहिणे का? तर परीक्षा म्हणजे एवढेच नाही. परीक्षा म्हणजे आपल्याकडील श्रवण, वाचन, लेखन, टिपण, स्मरण, मनन, चित्रकृती रेखाटन, एकाग्रता आदी विविध कौशल्यांचा सराव करून ते योग्य शब्दांत कसं मांडता येईल यात प्रावीण्य मिळवणे.

अभ्यास, परीक्षा, शिक्षण ही काही खूप अवघड, तापदायक, भीतीदायक गोष्ट मुळीच नाही. शिक्षण ही एक आनंददायी प्रक्रिया आहे. हसत–खेळत करण्याची गोष्ट आहे ती ! हो.. खरंच अगदी हसत –खेळत.. त्यासाठी एक अट आहे, ती म्हणजे अभ्यास आणि परीक्षेचा बागुलबुवा करायचा नाही. यांच्यापासून घाबरून दूर दूर पळायचे नाही. त्यांचा ताण घ्यायचा नाही. मोकळ्या, हसऱ्या मनाने अभ्यास करायचा आणि तितक्याच आनंदाने परीक्षा द्यायची. आता तुम्ही म्हणाल, हे कसे काय बुवा? तर त्यावर उत्तर आहे की, आधी तुम्ही मोकळे, हसरे, आनंदी तर व्हा की ! मग बघा अभ्यास करताना गंमत येते की नाही ते ! अभ्यासाकरिता आपली एकाग्रता अतिशय महत्त्वाची असते. याकरिता डोळे मिटून श्वासावर लक्ष केंद्रित करण्याचा सराव तुम्ही करायला हवा. सुईत दोरा ओवणे, चित्र काढणे, घरकाम करताना इतर विचार मनात येऊ न देणे, स्वच्छ अंघोळ करणे यातून मन एकाग्र करण्याची सवय तयार होते. मन ताजेतवाने असताना कमी आवडीचा किंवा तुम्हांला कठीण वाटणारा विषय पहिल्यांदा अभ्यासाला घ्या आणि ही गंमत पहा...





**किरण केंद्रे**
**कार्यकारी संपादक**

# परीक्षेची मजा

डॉ.उर्जिता कुलकर्णी



आज काय एकदम थाटात? 'चकचकीत' नवीन कोऱ्या शिसपेन्सिलीने लेखणीबाईंना विचारले.

''तू पण तर टेचातच आहेस की! मस्त मोठं टोक अगदी पुढे काढून.''

दोघी टाळ्या देऊन हसायला लागल्या. आज बबलीची परीक्षा. चौथीची. म्हणजे ही परीक्षा झाली की, बबली मोठ्या- दुसऱ्या शाळेत जाणार. लेखणीताई आणि शिसपेन्सिल दोघी जणी घरात चाललेली गंमत बघत होत्या!

सकाळपासून आईची नुसती धावपळ.

''बबली ऊठ, आवर लवकर. दोन वाजता पेपर आहे. बबली खा. बबली दूध पी. गणवेश काढून ठेवलाय. हां आण ते पुस्तक इकडे. चल जरा आवरत आवरत सांग बरं उत्तरं!'' बबली मात्र निवांत होती! मजेत अगदी. तिने सगळा अभ्यास व्यवस्थित केला होता. ते ही सुरुवातीपासून. नुसता परीक्षेपुरता नाही. त्यामुळे ती नेहमीसारखी हसत-खिदळत, टंगळ-मंगळ करत होती.

''काय बाई! अगं वार्षिक परीक्षा आहे . तुला काहीच कसं वाटत नाही. सगळं काय ते टेन्शन आम्हांलाच!''

आता बबलीला बहुतेक धपाटा मिळणार म्हणून लेखणीताई आणि शिसपेन्सिल, दोघीही एकदम चिडीचूप बसल्या तर बबली आईला म्हणाली. ''आई गं.. किती टेन्शन घेशील ..? चिल! आणि तुझ्या टेन्शन घेण्याने मला पेपर सोपा जाणारे की पहिला नंबर येणारे माझा!''

''माझं काही म्हणणं नाहीये बाबा की, पहिलाच नंबर आला पाहिजे, पेपर मस्त लिहून झाला की संपलं. त्यात जे जे विचारलंय त्यातलं किती येतंय, ऐनवेळेला किती आठवतंय, किती नीट लिहिता येतंय, हे कळेल मला. परीक्षा म्हणजे काही बागुलबुवा नाहीये. उगीच आपलं लावलंय परीक्षा... परीक्षा!''

आईला आता बबलीचा चांगलाच राग आला. ''हो! इकडे आम्ही इतकी मरमर करायची. अभ्यास घ्यायचा, आणि वर मलाच शहाणपण शिकव आता!'' बबली पटकन आईजवळ गेली. तिने आईच्या कमरेला एक मिठी मारली आणि म्हणाली, ''आयुडी, कशाला चिडतेस! मग मला पेपर खरंच अवघड जाईल हां!''

आईने तिला पोटाशी धरलं. प्रेमाने म्हणाली, ''नाही गं माझी राणी!''

बबली एकीकडे आवरत होती नि दुसरीकडे आईशी गप्पा मारत होती.

''आई, जर मला पेपर लिहिताना काहीच आठवलं नाही , लिहिता आलं नाही तर ..?''

''तर काय? तर परत परीक्षा द्यायला लागेल. पण असं होणारच नाही!'' आई सहज म्हणाली.

''बरोबर! कारण तू आणि बाबा मला कधीच रागवत नाही की, इतकेच मार्क कसे, अमुकच नंबर आला नाही, त्याला तुझ्यापेक्षा जास्त मार्क असलं काहीच नाही. म्हणजेच काय माझ्यासाठी परीक्षा म्हणजे वेगळं काही नाहीये! कारण तुम्ही ते तसं मला कधी वाटूच दिलं नाही. तरीही प्रत्येक वेळेला माझा पेपर म्हटलं की तू ही अशी बेचैन होतेस. ते का?''

आता आईला स्वतःच्याच वागण्यावर हसू आलं. कपाळावर हात मारत बबलीला आपल्या शेजारी बसवून घेत ती म्हणाली, ''खरंय गं बबली तुझं! पण आमच्या वेळेस ना बबली, या परीक्षाच सगळं ठरवायच्या. त्यामुळे त्यांची धास्तीच! जाऊदे तुझं बरोबर आहे. कधी एवढी शहाणी झालीस गं!''

परीक्षेसाठी आपलं दप्तर तयार करणारी बबली आईकडे न पाहताच म्हणाली. ''मी शहाणीच आहे बरं का! तुला सांगू का आई, मला परीक्षा म्हणजे ना एक गंमत वाटते. म्हणजे तू आणि बाबा मला कधीतरी एखादं काम सांगता ना तशीच. वरवर बघितलं तर अवघड वाटावी अशी, पण एकदा का पार पडायची ठरवली की मग आपली-आपली सोपी करून घेता येते. शाळेत शिकवताना माझं लक्ष असतंच की! भाषा, गणित, इतिहास सगळेच विषय एकमेकांपासून पूर्ण वेगळे. म्हणून कविता पाठ करायला जशी मजा येते, तशीच इतिहासातल्या गोष्टी समजावून घेताना, आणि गणितं सोडवताना सुद्धा. कितीतरी अभ्यास शाळेतच होऊन जातो. उरलेला तू किंवा बाबा घेतच असता. आम्ही मित्र-मैत्रिणीपण खेळताना मध्येमध्ये अभ्यासाचं बोलतो बरं का!'' असं म्हणत बबलीने मोठ्या माणसांचा आव आणत आईकडे पाहिलं. आई कौतुकाने तिच्याकडे पाहत तिचं बोलणं लक्ष देऊन ऐकत होती. बबली परत आपल्या कंपासपेटीकडे वळत म्हणाली,

''आणि ही जशी मार्कांसाठी परीक्षा असते, तशी कुठली-ना कुठली परीक्षा सारखीच सुरू असते. आता बघ काल तुझ्या नकळत एक छोटीशी मनीमाऊ मी घरात आणून ठेवली. तू रागावशील म्हणून तिला गुपचूप खायला-प्यायला घातलं. आणि कळलं तरी का तुला आणि बाबांना! परीक्षाच होती ती!''

इतकं बोलून बबलीने एकदम जीभ चावली, आणि घाबरत हळूच आईकडे पाहिलं. आई आता मात्र जोरजोरात हसायला लागली. तिने दुसऱ्या खोलीतून एक छानशी टोपली आणली. त्यात बबलीची मनी, मऊसूत पांघरुणावर निवांत झोपली होती! ''ही टोपली छान आहे ना तुझ्या मनीसाठी?''

बबली आनंदाने उड्या मारत टाळ्या वाजवायला लागली. तिने पट्कन मनीचे पापे घ्यायला सुरुवात केली.

पाचच मिनिटेंत मनीची रिक्षा आली, तेव्हा घाईघाईने ती घराबाहेर पडली सुद्धा. तशी आई तिच्या मागे जात म्हणाली, ''हं, हे घ्या बाईसाहेब. पेन आणि शिसपेन्सिल विसरून निघाली होतीस. धांदरट कुठली. यासाठीच आई- बाबांचं बारीक लक्ष असणं गरजेचं असतं, कळलं ना!''

बबलीने आईकडून लेखणी आणि शिसपेन्सिल घेतली. रिक्षा सुसाट निघाली तेव्हा तिने दोघींकडे डोळे मिचकावून बघितलं, आणि शिसपेन्सिल आणि लेखणीताईच्या कानात हळूच म्हणाली, ''कशी मज्जा केली आईची!''

**संपर्क : ९८२२६५१२९०**

**'किशोर' हे मासिक मालक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, बालभारती यांचेकरिता, मुद्रक व प्रकाशक विवेक उत्तम गोसावी यांनी मे. प्रिंटप्लस प्रा. लि., ई-१, जय जलाराम इंडस्ट्रीयल कॉम्प्लेक्स, व्हिलेज पिंपलास, ता. भिवंडी, जि. ठाणे ४२१३११. येथे छापून 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. * संपादक – कृष्णकुमार पाटील.**

**'Kishor' monthly publication is owned by Bureau of Text Book Production and Curriculum Research, Balbharati, Printed and Published by Vivek Uttam Gosavi, Printed at M/s. Printplus Private Limited, E-1, Jai Jalaram Industrial Complex, Village Pimplas, Taluka-Bhiwandi, Dist-Thane 421311. and Published at Balbharati, Senapati Bapat Road, Pune-411004. * Editor - Krishnakumar Patil.**

# अवतरले महात्मा फुले

प्रशांत वाघ

शोषितांचे दु:ख जाणुनी
हौदाचे पाणी केले खुले
समतेचा धडा शिकविण्या
अवतरले महात्मा फुले
जय जय जोती जय जय क्रांती ।


ज्ञानाची कवाडे उघडुनी
सन्मानाचे आयुष्य दिले
स्त्रियांचा उद्धार करण्या
अवतरले महात्मा फुले
जय जय जोती जय जय क्रांती ।

शेतकऱ्यांचा आसूड लिहूनी
पोशिंद्याचे दु:ख मांडिले
नवचेतना जागविण्या
अवतरले महात्मा फुले
जय जय जोती जय जय क्रांती ।

कष्टकऱ्यांना एक करूनी
हक्कासाठी लढण्या शिकविले
संघटनेचा मंत्र देण्या
अवतरले महात्मा फुले
जय जय जोती जय जय क्रांती ।

अनाथांचे कैवारी होऊनी
पीडितांना संरक्षण दिले
बालहत्या थांबविण्या
अवतरले महात्मा फुले
जय जय जोती जय जय क्रांती ।

प्रत्यक्ष कृती करूनी
इतरांना प्रेरित केले
नव्या युगाची पहाट होण्या
अवतरले महात्मा फुले
जय जय जोती जय जय क्रांती ।



संपर्क : ८८८८४९६६६३

## * चला चित्र रंगवूया...!!!

धनश्री केळकर



# सजीवांच्या पाणी पिण्याच्या पद्धती

शशिकांत काळे

प्रत्येक सजीवाच्या शरीरात मोठ्या प्रमाणावर पाणी साठवलेले असते. अवयवांच्या वाढीसाठी लागणारी पोषणद्रव्ये पाण्यात/रक्तात विरघळून त्या अवयवापर्यंत पोहोचवली जातात. शरीरातील पाण्याचे प्रमाण कमी झाले की, मेंदूला त्याची सूचना मिळते. आणि मेंदू तहानेद्वारे त्याची जाणीव करून देतो. उत्क्रांतीमध्ये माणूस इतर प्राण्यांहून वेगळा झाला. चार भिंतीच्या आत आपल्या सोयीप्रमाणे अन्न शिजवून खायला लागला. त्यामुळे जेवता-खाताना असो वा इतर वेळीही आपल्या सोयीनुसार पाणी पिऊ लागला. ज्या काळात त्याच्याकडे भांडी नव्हती. त्या काळात तो नदी, ओढ्या-तलावातील पाणी हाताच्या ओंजळीत भरून पिऊ लागला. आजही रानात सहलीला गेल्यावर ओंजळीने पाणी प्यायले जाते. नळावाटे पडणाऱ्या पाण्याखाली ओंजळ धरूनच पाणी प्यायला लागते. घरात पाणी पिण्यासाठी पेला/ग्लास असतो. अशा वेळी आपण भांडे तोंडाला लावूनच पाणी पितो. जर काही कारणाने पिण्यासाठी एकच भांडे असेल, तर भांड्याला तोंड न लावता उंचावरून धार धरून पाणी प्यायले जाते.

इतर पशूपक्ष्यांकडे अशी पाणी साठवण्यासाठी भांडी नसतात. त्यामुळे त्यांना पाण्याच्या साठ्याकडे जाऊनच पाणी प्यावे लागते. ते खाताना पाणी पीत नाहीत. त्यांच्या तोंडाच्या आकारमानानुसार त्यांच्या पाणी पिण्याच्या पद्धतीसुद्धा वेगवेगळ्या आहेत.


पक्ष्यांचे तोंड म्हणजे चोच. माणूस खोलवरचे पाणी भांडे आडवे न करता नळीच्या (स्ट्रॉ) साहाय्याने ओढून पितो. पण चोचीला असलेल्या फटीमुळे पक्षी अशा प्रकारे ओढून पाणी पिऊ शकत नाहीत. सनबर्ड हा अपवाद सोडल्यास सगळे पक्षी पाण्यात चोच बुडवून चोचीच्या खोलगट भागात साचलेले पाणी चोच उंच करून पितात.

शाकाहारी प्राणी पाण्यामध्ये तोंड बुडवून पाणी वर ओढून पाणी पितात. हत्ती मात्र त्याला अपवाद आहे. तो सोंडेमध्ये पाणी भरून घेतो आणि नंतर ते तोंडात सोडतो.

मांसाहारी प्राणीही पाण्यात तोंड बुडवून पाणी पितात. पण ते पाणी ओढत नाहीत. तर जिभेवर असलेल्या खवल्यामध्ये अडकलेले पाणी पितात. उदा. कुत्रा, मांजर तर वाघ, सिंह हे जीभ वळवून खोलगट भाग तयार करून पाणी तोंडात ओढून घेतात.

उंटासारखे वाळवंटातील प्राणी त्यांच्या शरीरात पाण्याचा साठा ठेवतात आणि आवश्यकतेनुसार वापरतात. वाळवंटातील काही प्राण्यांच्या खवल्यांमध्ये दवाचे पाणी साठते. ते तोंडात जमा होते. विंचवा- कोळ्यासारख्या किटकांना प्रत्यक्ष पाणी प्यावे लागत नाही. त्यांची पाण्याची सोय त्यांनी खाल्लेल्या भक्ष्यातील पाण्याने होते. बेडूक, क्रिकेट नावाचा कीटक कातडीद्वारे पाणी शोषून घेतो. माशी, फुलपाखरे यांना पाणी पिण्यासाठी सोंड दिलेली आहे. पाण्यात राहणारे मासेसुद्धा पाणी पितात.

संपर्क : ९९७५२४४४६७



# अप्पलपोट्या ढोलूराम

मुकुंद टाकसाळे

ढोलूरामच्या लहानपणीची ही गोष्ट आहे.

ढोलूराम नंबर एकचा अप्पलपोट्या होता. त्याच्या वर्गातल्या सईचा वाढदिवस होता. तिला भेट देण्यासाठी चॉकलेटचा बार विकत घ्यावा, म्हणून तो त्याच्या बाबाबरोबर एका चॉकलेटच्या दुकानात गेला. तिथली रंगीबेरंगी वेष्टनातली निरनिराळी चॉकलेटं पाहून तो एकदम हरखून गेला. त्याला 'हे चॉकलेट घेऊ का ते चॉकलेट घेऊ' असं झालं होतं. त्यानं गल्ल्यावर बसलेल्या ढिम्म चेहऱ्याच्या दुकानदाराकडं पाहिलं. त्याच्या मनात आलं, याच्या चेहऱ्यावर हसू दिसत नसलं तरी किती मज्जा आहे याची! भूक लागली की पोळी भाजी नाहीच खायची. थेट चॉकलेटच उचलायचं आणि तोंडात टाकायचं. किती भाग्यवान माणूस हा ! बसल्या बसल्या तो कितीतरी चॉकलेटं खात असेल.

बाबानं सईसाठीच फक्त एक चॉकलेटचा बार घेतला त्यावर तो म्हणाला, ''आणि मला?''

बाबा म्हणाला,''तुला तिथं वाढदिवसाला केक असेल. पिझ्झा असेल. शिवाय आणखीही काय काय तिखट गोड खायला असेल. लाडू म्हणा किंवा चिवडा म्हणा...आणि सईकडे तुला चॉकलेटही मिळेलच की.''

''मला नको काही. मला हेच चॉकलेटच हवं. तेही आत्ताच्या आत्ता,'' तो फुरंगटून म्हणाला.

पण त्याच्या बाबानं त्याचा हट्ट काही चालू दिला नाही. तो घरी जाईपर्यंत बाबाशी काहीही बोलला नाही.

घरी गेल्यावर तो बाबाला म्हणाला, बाबा, मी मोठ्ठा झालो की चॉकलेटचं दुकान काढणार.

तिथं सलीलदादा होताच. तो म्हणाला, ''बाबा, मस्त आयडिया आहे ही. तुम्ही मला आणि या ढोलूरामला एक चॉकलेटचं दुकान काढून द्या.''



''नाही रे बाबा, मला एकट्याला दुकान हवं. याला मी तिथं अजिबात येऊ देणार नाही. आणि सगळी चॉकलेटं मीच खाणार.''

''एँहॅंरे! दुकानात बसून सगळी चॉकलेटं तूच खाणार. मग लोकांना काय विकणार? आणि ढोलूराम, एवढी चॉकलेटं रोज खात बसलास तर दुप्पट ढोलूराम होशील. आणि तुझ्या दातांची तर पार वाट लागेल. सगळे दात किडतील आणि पडतील. तोंडाचं बोळकं होईल तुझ्या. मग छोटी कवळी बसवावी लागेल तुला. त्याला त्या वेळी सलीलदादाच्या नाकावर एक गुच्ची मारावी, असं वाटलं.''

खरं तर चॉकलेट जास्त खाल्लं की दात किडतात, म्हणूनच बाबानं या वेळी फक्त सईला भेट द्यायला त्याला चॉकलेट घेऊन दिलं होतं.

सईकडं तो वाढदिवसाला गेला खरा पण तिला एवढं मोठ्ठं चॉकलेट भेट देण्याचं त्याच्या जिवावर आलं होतं. वाढदिवस तिचा असला म्हणून काय झालं? तशात सईची आई म्हणाली, ''मुलांनो, चॉकलेट खाणं दाताला वाईट असतं त्यामुळे मी तुम्हांला खाण्यासाठी एक पौष्टिक खाऊ देणार आहे.'' तिनं प्रत्येक मुलाच्या हातात प्लॅस्टिकच्या छोट्या पिशवीत दोन खारका आणि खोबऱ्याचा तुकडा दिला. मऊ मऊ चॉकलेट खाण्याची सवय लागलेल्या मुलांना त्यातली खारीक दातानं फोडतानाच दात तुटेल की काय अशी भीती वाटली.

आपण असली ओबडधोबड खारीक चघळत बसायचं आणि सई मात्र ऐटीत चॉकलेट चघळत बसणार. पण आता आणलंच आहे तिच्यासाठी चॉकलेट तर तिला द्यावंच लागणार. त्याच्यासारखंच आणखीही काही मुलामुलींनी सईला वाढदिवसाची भेट द्यायला म्हणून चॉकलेटं आणली होती.

सईच्या आईपुढे पेच उभा राहिला होता. आता इतक्या जणांनी चॉकलेटं आणलीच आहेत तर ती घ्यायची की नाही घ्यायची? सईपण आशाळभूतपणे त्या चॉकलेटकडे डोळे लावून बसली होती. तिला देण्यासाठी आणलेली चॉकलेटं आपापल्या हातात घट्ट धरून मुलं उभी होती.

'सईच्या आईनं कोणत्याच मुलाचं चॉकलेट सईसाठी घेऊ नये, आणि तिचे दात मजबूत ठेवावेत',




असं ढोलूरामला मनातून वाटत होतं. बहुधा चॉकलेट आणणाऱ्या प्रत्येक मुलाला आणि मुलीला मनातून असंच वाटत होतं.

पण सईची दुष्ट आई अचानक म्हणाली, ''हे बघा मुलांनो, तुम्ही एवढ्या प्रेमानं सईसाठी चॉकलेटं आणली आहेत, तेव्हा सई, घे गं सगळ्यांकडून चॉकलेटं. पण आता शेवटचंच. परत सईसाठी चॉकलेट आणायचं ...?''

''नाही!'' सगळी मुलं जोरात ओरडली.

''आणि सई, तूपण ही चॉकलेटं पुरवून पुरवून महिनाभर खायची. काय? सगळी आजच गट्टम करायची ...?''

''नाही!'' सई जोरात ओरडली. एवढी सारी चॉकलेटं मिळणार यामुळे ती खूश झालेली होती. तिचे डोळे आनंदाने चमकत होते.

''म्हणजे आता आपल्याला चॉकलेट द्यावं लागणार.'' मनातल्या मनात ढोलूराम खट्टू झाला. त्याचा चेहरा चिमणीएवढा झालेला होता. एकेक मुलगा आणि मुलगी पुढे होऊन त्यांनी सईसाठी आणलेली भेटवस्तू तिच्या हातात देत होते.

अचानक ढोलूरामनं ठरवलं, 'आपण नाहीच द्यायचं चॉकलेट तिला. एवढ्या मुलांच्या गदारोळात आपण काही दिलं नाही, हे तिच्या लक्षातही येणार नाही.' तो चॉकलेट खिशात ठेवून इकडंतिकडं बघत राहिला. कुणाच्या काही लक्षात आलं नाही. मग तिच्याकडे भरपूर पिझ्झा खाऊन तो बाहेर पडला.



कितीही पोट भरलं तरी त्याच्या पोटात कधीही चॉकलेटसाठी जागा असायचीच. त्यामुळे घरी जाता जाताच त्यानं वाटेत चॉकलेटचा फडशा पाडला. घरी गेल्या गेल्या चॉकलेटच्या भोवतीचे चकचकीत कागदी वेष्टण त्यानं गुपचूप कोरड्या कचऱ्याच्या डब्यात टाकून दिलं आणि साळसूद चेहऱ्यानं तो घरात वावरू लागला.

''काय रे मजा आली का वाढदिवसाला?'' बाबानं विचारलं.

''हो, हो. खूप मजा आली. आणि मी सईला चॉकलेटही दिलं. तिला ते खूप आवडलं.'' तो घाईघाईनं म्हणाला.

''शाब्बास!''

''तू खाल्लंस की नाही?'' बाबानं विचारलं.

''हो'' पटकन तो ''हो'' म्हणाला खरं, पण त्याला लगेच त्याची चूक उमजली, ''नाही, नाही. मी नाही चॉकलेट खाल्लं. मी पिझ्झा खाल्ला.'' त्यानं घाईघाईनं खुलासा केला.

दुसऱ्या दिवशी सलीलदादानं जेव्हा कोरड्या कचऱ्याच्या पेटीत चॉकलेटचं चकचकीत कव्हर फेकलेलं पाहिलं तेव्हा त्याला ढोलूरामनं काही तरी गडबड केल्याचं लक्षात आलं. त्याने आईबाबांना लगेच ते दाखवलं. पक्का चहाडगुच्चा! मग सईला वाढदिवसाची भेट न देता ढोलूरामनंच आख्खं चॉकलेट गट्टम केल्याच घरच्यांच्या लक्षात आलं, तेव्हा सारेच खो खो हसू लागले. ढोलूराम चिडून म्हणाला, ''सईची आईच म्हणाली, चॉकलेट दाताला वाईट असतं म्हणून. म्हणून मी ते तिला दिलं नाही. तिचे दात खराब होतील म्हणून.''

''आणि तू खाल्लंस. तुझ्या दाताचं काय रे?'' सलीलदादानं विचारलं. पुढे तो ढोलूरामला चिडवण्यासाठी म्हणाला, ''बाबा, याच्या वाढदिवसाला आपण त्याच्या मित्रमैत्रिणींना छोट्या छोट्या कवळ्याच भेट देऊ. छोट्या आजी-आजोबांचाच तो मेळावा होईल.'' यावर अपेक्षेप्रमाणे ढोलूराम चिडला आणि सलीलदादाला ठोसा मारायला धावला. सलीलदादा पळू लागला. त्यांची ही पळापळ आणि आरडाओरडा पाहून आईबाबांना खूप मजा वाटत होती.

संपर्क : ९८५०८१७२१०






# उन्हाळा दारात येईल गं...

**फारुक एस. काझी**

थंडी संपली बाई उन्हाळा दारात येईल गं.... येईल गं....
रात होईल छोटी छोटी
दिस मोठा होईल गं... होईल गं....
मोहोर बहरेल बाई
पळस फुलून जाईल गं... जाईल गं...
द्राक्षं लगडतील वेलीला
कलिंगडात लाली भरेल गं.... भरेल गं....
पापड, सांगडे, भातवडी बाई
अंगणात पसारा होईल गं...होईल गं...
एकेक सांडगा तोंडात टाकत
राखणीला मजा येईल गं...येईल गं...
कैरीचं लोणचं बाई
स्ट्रॉबेरी गालात हसेल गं...हसेल गं...
चिकूच्या गोडव्यासंगे
उन्हाळा गोड होईल गं... होईल गं....

संपर्क : ९९२१३८०९६६







# यांनी मला घडविले...

मोगल जाधव

भारतीय संविधानाचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म १४ एप्रिल १८९१ रोजी मध्यप्रदेश राज्यातील महू येथे झाला. त्यांचे पूर्ण नाव भीमराव रामजी आंबेडकर आहे. रामजी हे त्यांच्या वडलांचे, तर भीमाबाई हे आईचे नाव होते. बाबासाहेबाचे मूळ गाव रत्नागिरी जिल्ह्यातील आंबवडे हे होय. त्यांचे आजोबा मालोजी व वडील रामजी हे ब्रिटिश सैन्यामध्ये नोकरीला होते. बाबासाहेब सहा वर्षांचे असतानाच त्यांच्या आईचे निधन झाले. बाबासाहेबांचा सांभाळ त्यांची आत्या मीराबाईनी केला.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी 'माझी आत्मकथा' हे पुस्तक लिहिले आहे. या पुस्तकात त्यांनी त्यांच्या आठवणी नमूद केलेल्या आहेत. 'यांनीच मला घडविले' या प्रकरणात त्यांनी आपल्या जडणघडणीत आपल्या गुरुंविषयी सांगितले आहे. बाबासाहेबांनी तीन गुरू मानले. पहिले गुरू 'गौतम बुद्ध' दुसरे गुरू 'संत कबीर' व तिसरे गुरू 'महात्मा जोतीराव फुले'.

कृष्णाजी अर्जुन केळुसकर हे बाबासाहेबांच्या वडलांचे स्नेही होते. त्यांनी 'गौतम बुद्धांचे चरित्र' हे पुस्तक लिहिले होते. १९०७ मध्ये बाबासाहेब मॅट्रिकची परीक्षा उत्तीर्ण झाले. त्या वेळी केळुसकर गुरुजींनी हे पुस्तक बाबासाहेबांना भेट म्हणून दिले होते. हे पुस्तक वाचल्यानंतर त्यांना पहिल्यांदाच गौतम बुद्धांच्या शिकवणुकीची माहिती मिळाली. पुस्तक वाचल्यानंतर त्यांना वेगळाच अनुभव आला. उच्च-नीचतेला बौद्ध धर्मात स्थान नाही. ते बौद्ध धर्माचे उपासक बनले. दुसरे गुरू संत कबीर हे होते. संत कबीरांच्या ठिकाणी भेदभाव नव्हता. तिसरे गुरू महात्मा जोतीराव फुले होत. त्यांच्या विचारांचे मार्गदर्शन बाबासाहेबांना लागले. बाबासाहेब म्हणतात, 'या तीन गुरूंच्या शिकवणुकीने माझे जीवन बनले आहे.'

तीन गुरुंप्रमाणेच बाबासाहेबांची तीन उपास्य दैवते होती. पहिले उपास्य दैवत 'विद्या' अन्नाप्रमाणेच माणसाला ज्ञानाची जरुरी आहे. बाबासाहेब म्हणतात, 'खरा प्रेमी ज्या उत्कटतेने प्रेयसीवर प्रेम करतो त्या उत्कटतेने माझे पुस्तकांवर प्रेम आहे. शत्रूलाही कबूल करणे भाग पडेल असे ज्ञान तुम्ही संपादिले पाहिजे. बाबासाहेबांचे दुसरे उपास्य दैवत 'विनयशीलता' हे आहे. बाबासाहेब म्हणतात, 'मी नेहमीच विनयशील असतो असे नाही. मात्र विनय म्हणजे लीनता, लाचारी नव्हे. मी लीनता त्याज्य समजतो. माणसाने स्वाभिमानाने जगले पाहिजे असे मला वाटते.' तिसरे उपास्य दैवत 'शीलसंवर्धन.' शीलसंवर्धनाविषयी सांगताना बाबासाहेब म्हणतात,'समाजकार्याचे ध्येय मी डोळ्यांपुढे ठेवले. पण चरितार्थासाठी कोणावर अवलंबून राहण्याची कल्पना मला कधीच सहन झाली नाही.'

समाजकार्यासाठी मी नोकरीत अडकलो नाही. परळला १०×१० च्या खोलीत मी कैक वर्षे काढली. कण्याची भाकरी आणि कण्याचा भात खाल्ला, पण मी कधी कोणाकडून स्वतःसाठी थैली घेतली नाही. मी कधी कोणाचे नुकसान केल्याचे अगर कोणाच्या बाबतीत अपकृत्य केल्याचा एकही दाखला मिळणार नाही. मला सुप्रीम कोर्टाचा न्यायाधीश होता आले असते. पण त्यात अडकण्यापेक्षा समाजकार्याच्या दृष्टीने काय होण्यासारखे आहे, असा मी विचार केला. मी माझ्या बुद्धीप्रमाणे चाललो. म्हणून शीलसंवर्धन हे मी माझे तिसरे उपास्य दैवत मानतो.'

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी आपल्या जीवनात आपले ध्येय साध्य करण्यासाठी आपल्या गुरुंची तत्त्वे प्रत्यक्षात आचरणात आणली. तसेच विद्या, विनयशीलता व शीलसंवर्धन या उपास्य दैवतांचा त्यांनी कधीही विसर पडू दिला नाही.

**संपर्क : ९६७३०९५७९६**

# इ. ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी 'बालभारतीची' मराठी व इंग्रजी माध्यमातील दर्जेदार व गुणवत्तापूर्ण प्रात्यक्षिक कार्य नोंदवही



राज्यातील इयत्ता ७ वी च्या विद्यार्थ्यांसाठी तज्ज्ञ शिक्षकांच्या सहाय्याने तयार करण्यात आलेल्या विविध विषयांच्या उपयुक्त प्रात्यक्षिक नोंदवह्या. दैनंदिन तसेच स्वयंअभ्यासाकरिता तसेच उजळणीकरिता उपयुक्त.








नोंदणीकृत विक्रेते व शैक्षणिक संस्थांना १५% सवलत

वरील प्रात्यक्षिक कार्य नोंदवही खरेदीकरिता मंडळाच्या खालील विभागीय भांडार व्यवस्थापकांशी संपर्क करावा

विभागीय भांडारे

पुणे–९४२३००५०७०, मुंबई (गोरेगाव)– ९४२३००५०७१, छत्रपती संभाजीनगर– ९४२३००५०७३, नागपूर– ९४२३००५०७२, नाशिक–९४२३००५०७४, लातूर– ९४२३००५०७५, कोल्हापूर– ८७९९९०९६५६, अमरावती ९४२३००५०७७, पनवेल– ९४२३००५०७८



# वसंतोत्सव

नीलकृष्ण देशपांडे

नववर्षाचा सूर्य उगवला,
गुढ्या तोरणे दारी!
अमृत सिंचन मंगल पूजन,
प्रसन्नमय प्रहरी ।।

अंकुरांना चैत्रपालवी,
सुगंध पखरण होई !
अंतर्यामी धरणी कणकण,
डहुळूनिया जाई।।

आसमंती तो मोहोरांचा,
मादक सुगंध ओला।
आळविती स्वर पंचम कोकीळ,
वसंत भुवनी आला।।

अरिष्ट संपून इष्ट घडावे,
चिंता जावो लया ।
प्रसन्नता ये अंतःकरणी,
सुदृढ राहो काया।।

उत्कर्षाने व्यापो जीवन,
नवोन्मेष अंतरी ।
संकल्पाची गुढी, तोरणे,
कल्याणाची दारी ।।

संपर्क : ९४२०११५२३५

# प्रयोग

डॉ. पंडित विद्यासागर

निरीक्षणावरून अनुमान काढता येते हे आपण या पूर्वीच्या भागात पहिले. एकाच शेताच्या दोन भागात कमी अधिक जोमाने पीक येते हे निरीक्षण आणि त्याही पुढे जाऊन हे गांडुळांमुळे होते हे अनुमान शेतकऱ्याने काढले. या अनुमानाची पुनः पुनः खात्री करणे आणि अनुमानाचे रूपांतर निष्कर्षामध्ये करणे आवश्यक असते. यासाठी प्रयोगाची मदत घ्यावी लागते. आता तुम्ही म्हणाल की, 'प्रयोग म्हणजे नेमके काय?' 'प्रयोग म्हणजे आपण जो निष्कर्ष काढणार असतो, त्या निष्कर्षापर्यंत पोहोचण्यासाठी केलेली योजना. उदाहरणार्थ गांडुळे असणाऱ्या शेतात पीक अधिक जोमाने येते हा निष्कर्ष तपासायचा आहे. यासाठी कमी जोमदार पीक येणाऱ्या भागात गांडुळे वाढवली तर? गांडुळे असल्यामुळे पीक जोमदार आले तर आपला निष्कर्ष खरा ठरेल. याही पुढे जाऊन हाच प्रयोग इतर ठिकाणी आणि इतर देशांत करून तोच परिणाम दिसला तर आपला निष्कर्ष जागतिक होईल. विज्ञानाला हे अपेक्षित असते. प्रयोगाविषयी आता आपण काही ओव्या पाहू...'



**परी निरीक्षणाहूनी थोर।**
**असे प्रयोगाची धार।।**
**प्रयोग सिद्ध सार।**
**मान्यता पावे विज्ञानात।।**
**केवळ सिद्धांत मांडला।**
**परी प्रयोगे नाही पडताळीला।।**
**तरी तो सिद्धांतच राहिला।**
**अंतिम मान्यता त्यास नसे ।।**




प्रयोगाद्वारे सिद्धांत पडताळला नाही तर तो सिद्धांतच राहतो हे वरील ओवीमध्ये सांगितले आहे. यासाठी प्रयोग करताना काही पथ्ये पाळावी लागतात. प्रयोगाची योजना केली की, त्यात ढवळाढवळ करता येत नाही. निरीक्षणे आहेत तशीच स्वीकारावी लागतात. त्यात आपल्याला हवा तसा बदल करण्याची मुभा नसते. आलेल्या निरीक्षणावरून निष्कर्ष काढताना तारतम्य बाळगणे आवश्यक असते. त्याविषयी एक गमतीदार गोष्ट तुम्हांला सांगतो. या गोष्टीत दिला आहे असा प्रयोग तुम्ही करू नका. दोन विद्यार्थी झुरळावर प्रयोग करत असतात. त्यांनी प्रथम त्याचा एक पाय जायबंदी केला आणि आवाज केल्यावर ते झुरळ थोडे पुढे गेले. त्यांनी दुसरा पाय जायबंदी करून आवाज केल्यानंतरही ते पुढे गेले. अशा प्रकारे सर्व पाय जायबंदी करून आवाज केल्यावर ते झुरळ पुढे गेले नाही. यावरून त्या विद्यार्थ्यांनी काय निष्कर्ष काढला असेल? त्यांनी असा निष्कर्ष काढला की, झुरळाचे सर्व पाय जायबंदी केले तर झुरळाला ऐकू येत नाही.

प्रयोगाचे महत्त्व किती आहे हे पाहण्यासाठी आपण एक ऐतिहासिक घटना पाहू. आईन्स्टाईन हे नाव तुम्ही ऐकले असेल. जगातील ते एक महान शास्त्रज्ञ. त्यांनी सापेक्षता सिद्धांत मांडला. या प्रयोगानुसार खूप मोठे वस्तूमान असणाऱ्या ताऱ्यामुळे प्रकाश आपला मार्ग बदलतो असे अनुमान निघाले. मात्र हे प्रयोगाने सिद्ध होऊ न शकल्याने १९२१ साली त्यांना या शोधासाठी नोबेल पारितोषिक दिले गेले नाही. त्यांना त्यांच्या प्रकाश परिणामासंबंधीच्या दुसऱ्या शोधाबद्दल देण्यात आले. पुढे प्रकाश मार्ग बदलतो हा सिद्धांत प्रयोगाद्वारे सिद्ध झाला.

प्रयोगाचा उपयोग विज्ञान शिकण्यासाठी खूप महत्त्वाचा आहे. विज्ञान हा पाठ करण्याचा विषय नाही. प्रयोगाद्वारे शिकल्यास तो सोपा वाटतो तसेच त्याचे आकलन चांगल्या प्रकारे होते. याला शोधन पद्धत म्हणतात. यासाठी तुम्ही प्रयोग करायला हवेत. प्रयोगाची सुविधा शाळेत असते त्याचा उपयोग करा, आता अनेक गावांत विज्ञान प्रयोगशाळाही असतात. तुम्ही घरीही प्रयोग करू शकता. हे प्रयोग कसे करावेत यासाठी काही पुस्तके उपलब्ध आहेत. त्यांचाही उपयोग होऊ शकतो. शिवाय शाळेत प्रयोगशाळा असावी असा आग्रह धरा. मी एक छोटासा प्रयोग तुम्हांला सांगतो. तो तुम्ही घरी करू शकता. एक काचेचा ग्लास घ्या. त्यात तीन चतुर्थांश पाणी भरा. त्यामध्ये मधोमध एक पेन्सिल उभी करा. समोरून पाहिल्यास ती सरळ दिसते. आता ती बाजूकडे सरकवा, ती वाकडी दिसते. असे का होते हे समजून घ्या. प्रकाशाच्या कोणत्या गुणधर्माशी याचा संबंध आहे? यासारखे कोणते प्रयोग तुम्ही घरी करू शकता याचा शोध घ्या.

विज्ञानाचे शोध अशा प्रयोगांतून लागले आहेत. हे प्रयोग केले ते अर्थातच शास्त्रज्ञांनी! त्याचा इतिहास काय आहे हे आपण पुढील काही भागांत पाहू.

**संपर्क : ९४२०४८३४८७**




# डबल डेकरचा निखळ आनंद

पीयुष सेखसरिया
अनुवाद : प्रसाद कुलकर्णी

मुंबईच्या प्रतिष्ठित अशा डबल डेकर बसची सेवा ५ ऑक्टोबर २०२३ रोजी बंद करण्यात आली. आता काही निवडक मार्गांवर इलेक्ट्रिक एसी डबल डेकर बस आल्या असल्या, तरी अनेकांसाठी डबल डेकरमधला तो निखळ आनंद आता पूर्वीसारखा नसतो. यावरून मला आठवले, की मी डबल डेकर रेल्वेने नुकताच मुंबई–अहमदाबाद प्रवास केला. मी वरच्या डेकवर आरामात बसलो. मला त्या वेळी मी लहानपणी पुणे–मुंबई सिंहगड एक्स्प्रेसमधून केलेल्या प्रवासाची आठवण झाली. देशात प्रथम, १९७८मध्ये, ही एक्स्प्रेस डबल डेकर झाली होती. त्या वेळी डबल डेकर बसही होत्या. लहानपणी माझे चक्क या बसचा ड्रायव्हर होण्याचे स्वप्न होते! डबल डेकरचा हा

निखळ आनंद रेल्वे किंवा बसच्या बाबतीतच प्रथम झाला असेल, असे वाटत असेल, तर जरा थांबा! वास्तविक १८२०च्या दशकात मालवाहू घोडागाडीला दोन डेक होते. त्यातील वरचा डेक तर कुठल्याही छपराविना होता. पूर्ण खुला! निम्म्या भागात खाली नियमित भाडे असायचे. चढण्या-उतरण्यासाठी बाहेरच्या बाजूला शिडी असायची. या घोडागाड्यांची जागा १९३०च्या दशकात डबल डेकर बसने पूर्णपणे घेतली!

रेल्वेही यामध्ये मागे नव्हत्या. १८५०च्या दशकात फ्रान्समध्ये दुसऱ्या डेकला पातळ छप्पर आणि दोन्ही बाजू खुल्या असलेल्या शंभराहून अधिक डबल डेकर रेल्वे होत्या. डबल डेकरमध्ये १८६०च्या दशकात एक मोठी उत्क्रांती झाली. पहिलीवहिली दुमजली रेल्वे गाडी प्रत्यक्षात आली. गुरुत्वीय मध्य कमी राहावा, यासाठी यातील खालचा डेक बऱ्यापैकी खाली ठेवण्यात आला होता. डब्याची एकूण उंची ४.१७ मीटर, तर खालच्या भागाची उंची जेमतेम १.६५ मीटर इतकी होती. ब्रिटनमध्ये पहिलीवहिली डबल डेकर रेल्वे १९४८ मध्ये धावली, तर भारतामध्ये सिंहगड एक्स्प्रेस १९७८ मध्ये प्रथम धावली. 'सिंहगड'चे काहीच डबे डबल डेकर होते. भारतातील पहिली पूर्ण डबल डेकर रेल्वे 'मुंबई-सुरत फ्लाइंग राणी' १९७९ मध्ये सर्वप्रथम धावली. डबल डेकर रेल्वे गाड्यांसाठी सुरुवातीला इतर मार्ग निवडण्यात आले होते. डबल डेकर रेल्वे खऱ्या अर्थाने २०११ मध्ये रेल्वेने गांभीर्याने घेतली. सहा इंटरसिटी मार्गांवर पूर्ण वातानुकूलित डबल डेकर रेल्वे या वेळी प्रस्तावित करण्यात आल्या.

कापूरथळा येथील 'द रेल कोच फॅक्टरी'ने पूर्ण स्टेनलेस स्टीलची, वातानुकूलित डबल डेकर कोचेसची निर्मिती केली. यामध्ये १२० प्रवासी बसू शकत होते. प्रवासी क्षमतेमध्ये ५५ टक्क्यांनी वाढ झाली. नियमित डब्यांच्या तुलनेत मात्र ही काहीशी कमी होती. डब्यांमधील अंतर योग्य तऱ्हेने ठेवून जागेचा पुरेपूर वापर करण्यात आला. रेल्वेच्या दोन्ही बाजूंच्या शेवटी असलेल्या दोन 'पॉवर कार'च्या माध्यमातून डब्यांमध्ये दिवे आणि वातानुकूलनाची सोय करण्यात आली.

भारतामधील डबल डेकरचे प्रारूप १८६०मधील प्रारूपाच्या तुलनेत केवळ २० सेंटिमीटर अधिक होते! ते ४.३६६ मीटर इतके होते. ही आकडेवारी युरोपमधील डबल डेकरशी जुळणारी होती. युरोपमधील डबल डेकर ४.३ ते ४.६३ मीटर यांदरम्यान होती. डब्याचा खालचा भाग बऱ्यापैकी खाली ठेवल्याने डब्याची एकूण परिणामकारक उंची नियमित डब्यांपेक्षा अधिक असायची. वाटेतील उंचावरील भाग, पूल, 'इलेक्ट्रिक ट्रॅक्शन'चे साहित्य यांसारख्या अडथळ्यांवरील उपाय 'डबल डेकर'च्या बाबतीत शोधायला हवेत. हे उपाय शोधले, तर पक्क्या वास्तूंमध्ये अथवा इतर रचनांमध्ये कुठल्याही प्रकारचा बदल करावा लागणार नाही.

काही वर्षांपूर्वी, राजस्थानमध्ये प्रवास करताना प्रवाशांना बसच्या टपावर बसताना पाहिले. बस स्टॉपवरील प्रवासी बसच्या मागच्या बाजूने शिडीवरून चढून टपावर जात होते आणि सामान ठेवण्याच्या जागी बसत होते. ते पाहून माझी उत्सुकता वाढली. बसमधून फुकट प्रवास करण्याच्या उद्देशाने प्रवासी असे करीत असावेत, असे मला वाटले. मात्र, घडले भलतेच! बसचा वाहक (कंडक्टर) त्यापेक्षाही हुशार निघाला. चालत्या बसमधून मागील दाराने तो बाहेर आला. शिडीवरून वरच्या प्रवाशांकडे गेला. त्यांच्याकडून तिकिटांचे पैसे घेतले. त्यांना परत सुटे पैसे आणि तिकीट दिले आणि पुढचा बस स्टॉप येण्याच्या आधी तो पुन्हा बसमध्ये परत आला! माझ्या आयुष्यातील डबल डेकरचा हा सर्वोत्कृष्ट असा अनुभव होता. आणि हो... दुसऱ्या डेकवरील प्रवाशांसाठीही तिकिटाचे दर (खालच्या प्रवाशांप्रमाणे) सारखेच होते.

**संपर्क :** ८७९३००२८१०

# राजा आणि ढोल

अनुवाद : माधुरी दीक्षित

## चिंचेच्या झाडाविषयीची मूळ भारतीय लोककथा

मध्य भारतात राहणाऱ्या एका राजाला त्याच्या देखणेपणाचा फार गर्व होता. तो सतत स्वतःला बघायचा – आरशात, तळ्यात, आणि अगदी लोकांच्या डोळ्यांत सुद्धा! राज्यकारभार हाकण्यापेक्षा स्वतःच्या केशरचनेमध्ये आणि तेल लावून अंघोळ करण्यामध्ये त्याचा जास्त वेळ जाई. लोक बिचारे गरीब झाले, अडचणींनी त्रासून गेले, तरी राजाला काही चिंता वाटली नाही. मी तर देवांपेक्षाही अधिक सुंदर दिसतो, अशी बढाई त्याने एक दिवस भर दरबारात मारली आणि ती नेमकी, त्या वेळी तिथून उडत उडत जाणाऱ्या एका देवाने ऐकली, आणि तो चिडला. याचं काहीतरी केलं पाहिजे, त्यानं मनोमन ठरवलं. एवढ्यात त्याची नजर एका बैलावर पडली, आणि त्यानं आनंदानं टाळीच वाजवली. सुचलं. शिंगं! कसा दिसतो हा देखणा राजा शिंगं उगवल्यावर, बघू या तरी!.

राजा सकाळी उठला. नेहमीच्या सवयीनं त्यानं तोंडासमोर आरसा धरला, आणि त्याच्या तोंडून एक किंकाळी बाहेर पडली. ती ऐकून पहारेकरी धावत महालात आले. पाहतात तर काय राजा अंथरुणावर उठून बसलेला होता आणि त्यानं डोक्यावर उशी दाबून धरलेली होती. ''बाहेर जा आधी, तो ओरडला, राजनाभिकाला (राजन्हाव्याला) पाठवा लवकर.''



राजनाभिक (राजन्हावी) आला तसा राजा त्याला म्हणाला, ''माझ्याजवळ ये. मी तुला आता जे दाखवीन त्याविषयी कुठं चकार शब्द काढशील तर याद राख. मुंडकं छाटीन तुझं!'' राजानं उशी बाजूला करताच राजनाभिक दचकला. ''नुसता बघत काय बसलास, शिंगं लपवायला कर काहीतरी.'' राजनाभिकाने कशीबशी ती शिंगं केसांखाली अर्धवट लपवली आणि त्याच्यावर राजानं टोपी चढवली. ''आता दरबारात जाऊन सांग की मला बरं वाटत नाहीये. पण मी तुला काय सांगितलं ते लक्षात ठेव.''

महालातून राजनाभिक बाहेर पडला तसा त्याला पहारेकऱ्यांनी थांबवलं. पण तो नुसताच डोकं हलवत, हसू दाबत निघून गेला. पण त्याच्या पोटात कशाची ही बातमी गुप्त राहायला! आता ही मजा कुणाला तरी सांगितल्याशिवाय काही मला राहवणार नाही, असं राजनाभिकाच्या मनात आलं. राजवाड्यात चालता चालता त्याला समोर चिंचेचं एक डेरेदार झाड दिसलं. त्याच्या खोडापाशी जात राजनाभिकानं झाडालाच गंमत सांगून टाकली. झालं असं की त्या रात्री जोरदार वादळात ते झाड पडलं. राजानं महालातूनच आज्ञा देत त्या झाडाचं लाकूड राजवादकाकडे पाठवलं. त्याचा एक ढोल बनवून राजाच्या महालाच्या दारात वाजवण्याचा आदेश दिला. सगळे दरबारी ऐकायला जमले आणि काय आश्चर्य, त्या ढोलातून नेहमीच्या ढम, ढम, ढम बोलांऐवजी असे वेगळेच बोल बाहेर पडले – ''राजाला शिंगं आली, राजाला शिंगं आली.'' दरबारी हसून हसून बेजार झाले. राजा संतापानं लालेलाल झाला, तडक तो ढोल काखेत मारून राजवाडा सोडून जंगलात निघून गेला.







अनेक वर्ष जंगलात काढताना राजाला खूप नवे. नवे, शिकवणारे अनुभव आले. त्याला आजूबाजूचा निसर्ग कळला, पशुपक्ष्यांची काळजी कशी घ्यावी हे कळलं, त्याची तब्येत सुदृढ झाली, आणि त्याला भरपूर शहाणपण आलं. जंगलात तो ढोलच त्याचा एकमेव सोबती होता. तो वाजवला की त्याला त्या चिंचेच्या झाडाचे शहाणे, अनुभवाचे बोल आणि सल्ला ऐकायला मिळे. राजा तो ढोल सुंदर रीतीने वाजवायला शिकला. आजूबाजूच्या वनदेवता ते ऐकून खूश होत असत. राजा खूप बदलला आहे हे जाणून त्यांनी त्या देवाकडं राजाची शिंगं काढून टाकण्याची विनंती केली. देवानं त्यांचं ऐकलं आणि शिंगं गायब झाली.

दुसऱ्या दिवशी तळ्यात वाकून पाणी पिताना राजाला त्याच्या रापलेल्या चेहऱ्यावरची शिंगं नाहीशी झालेली दिसली आणि तो आश्चर्याने दंग होऊन तळ्याकाठी बसला. इतक्यात त्याचे दरबारी तिथे घोड्यावरून दौडत दौडत आले, आणि त्याला प्रणाम करून म्हणाले, ''महाराज, आम्हांला क्षमा करा आणि परत चला. राज्याला तुमची गरज आहे.''

त्यांच्या विनंतीला मान देऊन राजा दरबारात परत आला. तो ढोल आपल्या शेजारीच ठेवून राज्य करू लागला. त्या राजनाभिकाचं डोकं वाचलं खरं, पण नोकरी गेली ती गेलीच!

**भारतात अनेक ठिकाणी झाडांभोवती गुंफलेल्या लोककथा आढळतात. डेरेदार, हिरव्यागार दिसणाऱ्या, आंबटगोड चिंचा आणि सावली देणाऱ्या चिंचेच्या झाडाविषयी सापडलेली ही एक लोककथा.**

**(ब्रम्हाज हेअर : 'ऑन द मायथोलोजी ऑन इंडियन प्लांट्स') या मनेका गांधी आणि यास्मिन सिंग यांनी संपादित केलेल्या, पुस्तकातून साभार)**

**संपर्क : ९४२३५८६३४८**

# झुमके

नंदिनी कदम

शाळेची मधली सुट्टी झाली आणि, सगळ्या मुली डबा खायला बसल्या. गप्पागोष्टी करत त्यांचे खाणे चालू झाले. मीनाच्या कानात हलणाऱ्या झुमक्यांकडे नलूचे लक्ष गेलं. ''किती छान आहेत मीना तुझे झुमके!'', ''अगं आईने आणले बाजारातून.'' ''थांब तुला काढून देते''. ''अगं नको, छान दिसतात तुझ्या कानात.'' ''थांब तू, तूपण घाल ना तुलाही छान दिसतील'', मिनानं झुमके नलूला घालायला दिले. तिलाही ते खूपच सुंदर दिसत होते. सगळ्या मैत्रिणी म्हणाल्या ''नलू छान दिसतात गं, राहू दे थोडा वेळ तुझ्या कानात. वर्गात गेल्यावर दे.'' नलूलाही ते मनापासून आवडले होते, त्यामुळे ती तयार झाली. सगळ्या मैत्रिणी खेळण्यात दंग झाल्या.. जेवणाची सुट्टी संपल्याचं टोल पडले तशा सर्व जणी वर्गात आल्या.

मॅडम वर्गात यायच्या आधी मीनाचे झुमके देऊया



असा विचार करून नलूने कानाला हात लावला अन् तिच्या काळजात धस्स झालं. एका कानातला झुमका कुठेतरी पडला होता. तिला तर रडूच आलं. तिच्या शेजारीच बसलेल्या मीनाच्या हे लक्षात आलं. नवीन कानातलं हरवलं म्हणून तिला खूपच वाईट वाटत होतं. आपण? नलूला ते का घालायला दिले म्हणून स्वतःचा रागही येत होता. मॅडम अजून आल्या नव्हत्या, म्हणून त्या दोघी खेळत होत्या त्या ठिकाणी शोधून आल्या. पण झुमका काही सापडलाच नाही. आता मात्र मिनूनेही रडायला सुरुवात केली. ''आई मला मारेल. मी काय सांगू तिला? कालच आणलं होतं तिने. नलू, मला माझे कानातले भरून पाहिजे.'' आता मात्र नलूच्या हृदयाची धडधड वाढली. कानातले चांगलेच महाग होते. 'आपण पैसे आणायचे कसे? आपल्या घरी कळलं तर, दुसऱ्याच्या वस्तूला हात का लावला? म्हणून आपल्यालाच रागवतील बाबा. पैसे कसे मागायचे? किती रुपयांचे कानातले होते', दोघींनाही माहीत नव्हतं. तशाच त्या वर्गात गेल्या. अभ्यासाकडे नलूचे लक्ष नव्हतं.

शाळा सुटली तसं दोघी शाळेजवळ असणाऱ्या कटलरीच्या दुकानात शिरल्या. खूप शोधल्यानंतर त्या झुमक्यासारखे झुमके सापडले. दोघींचाही चेहरा खुलला., ''काका हे कितीला आहे?'', ''ऐंशी रुपये'' हे ऐकताच नलूच्या काळजाचा ठोका चुकला. 'बापरे ! बाबांकडे कसे मागायचे पैसे? आईकडे पैसे असतील की नाही माहीत नाही? नसतीलच बहुतेक. त्या दिवशीच नवीन कंपास घे म्हणाले, तर पगार झाल्यावर घेऊ; आता पैसे नाहीत. म्हणाली. आता काय करायचं?' या विचारातच ती घरी पोहोचली.

मोठी बहीण घर झाडत होती. नेहमी घरी आल्यावर शाळेतल्या गमतीजमती तासन्तास सांगणारी नलू आज शांत कशी? आईने आवाज दिला. नलू चहा चपाती खाऊन घे.'' कसंतरी तिने ते खाल्लं पण आईच्या नजरेतून मात्र हे सुटले नाही. ''काय गं काय झालं? सर ओरडले का? काही झालं का शाळेत? शांत का आहेस?'' ''काही नाही दमले मी'' ''एवढं खेळायला कोण सांगत?'' मध्येच ताई बोलली. इतर वेळी तिने ताईचा हा टोमणा असा वाया जाऊ दिला नसता. त्याला प्रत्युत्तर केलं असतं. पण आज ऐंशी रुपये तिच्या डोळ्यांसमोर फिरत होते.

अभ्यास करून झाल्यावर आईशी बोलण्याची ती संधी शोधत होती. तिच्याभोवती घुटमळत होती. पण आईभोवती सतत कोणी ना कोणी असल्यामुळे तिची निराशा झाली.

दारावरची बेल वाजली. बाबा आले. नेहमीच्या सवयीप्रमाणे त्यांनी हातपाय धुताना शर्ट काढून नलूकडे दिला. दाराच्या मागे असलेल्या खुंटीवर तिने शर्ट अडकवला.

तितक्यात तिची नजर बाबांच्या खिशात असणाऱ्या नोटांकडे गेली. एक क्षण...! एक क्षण तिच्या मनात वेगळेच विचार डोकावून गेले. तिने घरातील इतर लोकांचा कानोसा घेतला. आपल्याकडे कोणाचेही लक्ष नाही, असं पाहून तिने पटकन सुट्टे पैसे मोजून बरोबर ऐंशी रुपये घेतले. त्या गडबडीत पडलेली शंभरची नोट तिने पुन्हा शर्टाच्या खिशात कोंबली. लगबगीने पैसे



नेऊन दप्तरात ठेवले.

पैसे मिळाले पण तिला आनंद नाही झाला. एक अनामिक भीती तिच्या मनात होती. 'बाबांना कळलं तर?' दप्तराला जवळ घेऊनच ती बसली. आई म्हणाली ''चला जेवायला बसा.'' इकडच्या तिकडच्या गप्पा मारत जेवण झालं. पण आज ती सर्वांच्या सोबत असूनही त्यांच्यात नव्हती. तिचं मन तिला खात होत आणि कधी एकदा सकाळ होते, त्या दुकानातून ते झुमके घेऊन मीनाला देते असं तिला झालं होतं. त्याच विचारात ती अंथरुणात पडून होती. पण शांत झोप लागली नाही तिला. आईने पुन्हा विचारलं, ''काही दुखतंय का गं बाळा?'' ''ऊ..हू...'' असं म्हणत ती आईला बिलगली. आई तिच्या केसातून अलगद हात फिरवत तिला थोपटू लागली तशी ती शांत झोपली.

सकाळी जाग आली तसं तिचं लक्ष दप्तराकडे गेलं, ते त्याचा जागेवरच होतं. आज बाबा घरी होते. त्यामुळे आईची डब्याची घाई नव्हती. ताईचे कॉलेज सकाळचे होते. नलूची शाळा दुपारची. अंघोळ-नाश्ता आवरून नलू शाळेची वेळ होईपर्यंत अभ्यास करत बसली. सातवीच्या वर्गातील ती हुशार, आदर्श विद्यार्थिनी होती. डबा घेऊन ती शाळेत जायला निघाली. निघताना तिने परत पैसे जागेवर असल्याची खात्री केली आणि ती लगबगीने निघाली. दुकानाच्या दारात आल्यावर मात्र आत जायला तिचं मन धजावेना; आपण कसं असं करू शकतो? तिला रडूच आलं. झुमके न घेता ती शाळेत गेली. वर्गात मिना तिची वाट पाहतच होती. ''आणलेस झुमके?'' ''नाही'' नलूने मान खाली घातली. मीनाला आता तर खूप राग आला होता. ''मी माझ्या आईला काल खोटं सांगितलं की, तुला घालायला दिलेत म्हणून आणि तू आज देणार आहेस'' नलूला काय बोलावं सुचतच नव्हतं. आधीच बाबांच्या खिशातील पैसे न विचारता घेतल्याने तिचं मन तिला खात होतं. मीना रागवल्याचेही दुःख होतंच. शाळा सुटल्यावर बघू असा विचार तिने केला. आज दिवसभर मीना तिच्याशी बोललीच नाही. शाळा सुटल्यावर नेहमी पळत सुटणारी नलू, आज अगदी जीवावर पावले टाकत होती. ''बाबांच्या लक्षात आले असेल का? ते काय विचार करतील? सगळे मला चोर म्हणतील का?''

अशा अनेक प्रश्नांचं काहूर तिच्या मनात उठत होतं. घरी पोहोचल्यावर तिची बाबांकडे बघायची हिंमतच नव्हती. ''नलू कपडे बदलून लवकर ये.'' बाबांच्या आवाजातील बदल तिच्या पटकन लक्षात आला. तिला दरदरून घाम फुटला. 'हो' म्हणत ती कपडे बदलायला आत गेली. 'आपण का असे वागलो? आता विचार करून काय उपयोग?' मनातल्या मनात ती चरफडत होती. कपडे बदलून ती बाबांसमोर आली. बाबांनी सर्वांनाच आवाज दिला. आता सगळ्यांसमोर आपण चोरी केली हे कळणार. तिचा चेहरा काळवंडला. बाबा म्हणाले, ''नलू इकडे ये'' घाबरतच ती त्यांच्याजवळ गेली. तिला जवळ घेत ते म्हणाले, ''शाब्बास!'' तिला काहीच कळेना. अचानक त्यांनी असं शाबासकी देण्याचंही तिला त्रासदायक वाटत होतं. आपल्या नलूला स्काऊट गाईडकडून 'बेस्ट गाईडचा' पुरस्कार मिळाला आहे. एक गुलाबजाम तिला भरवत बाबांनी तिच्या गालाचा पापा घेतला.

'आपण आहोत का खरा गाईड? काल जे आपण वागलो ते बेस्ट गाईड कधीच करणार नाही.' तिच्या डोळ्यांतून अश्रू वाहू लागले. ''अरे बाळा, काय झालं? रडतेस का अशी?'' तिच्या या अकल्पित प्रतिक्रियेने तिचे वडीलही भांबावले. ''बोल ना बाळा काय झालं?'' आता मात्र तिचा बांध फुटला. तिने बाबांना घट्ट मिठी मारली. ''मी चुकले बाबा. मी बेस्ट गाईड नाही.'' ती हुंदके देऊ लागली. ''काय झालं? ते तरी सांग?'' रडत रडत तिने सर्व हकीकत सगळ्यांसमोर सांगितली. एक क्षण आई-बाबांनाही वाईट वाटलं. पण तिनं आपली चूक योग्य वेळी कबूल केल्याचं समाधानही वाटलं त्यांना. तिनं पटकन बॅगेत ठेवलेले पैसे त्यांच्या हातात दिले. ''बाबा, मी नाही खर्च केले पण मी चोरले ''तुमच्या खिशातून; पण मी नाही खर्च करू शकले नाही.'' ''बाळा तू, चूक केलीच पण तुझी चूक कबूल केली आणि तू ते पैसे परत आणलेस. खरंच तू बेस्ट गाईड नाहीस तर आमची बेस्ट डॉटरसुद्धा आहेस. आता रडणं बंद कर आणि हे पैसे घे आणि मिनाचे झुमके तिला घेऊन दे.'' ''थँक्यू बाबा'' असं म्हणत ती पुन्हा बाबांच्या कुशीत शिरली.

**संपर्क : ९०२९०५५९५१**

# आकाशातली बाग

राजन पोळ

सुंदर सुंदर बाग
आहे आकाशात
सूर्य उगवला की
फुलते प्रकाशात

सुंदर सुंदर बागेत
ब्रम्हकमळाची फुले
रंगीबेरंगी झोपाळे
इंद्रधनुचे झुले

सुंदर सुंदर बागेला
ढग घालतात पाणी
पंख आपुले पसरूनी
परी गाते गोड गाणी

आकाशातल्या बागेत
सोनेरी चंदेरी झाडे
सभोवताली बागेच्या
निळे–जांभळे वाडे

आकाशातल्या बागेत
आहे गुलाबाचे रान
फुलपाखरं चांदण्यांची
लुकलुकतात छान

आकाशातल्या बागेची
वाट आहे मखमली
ढगांच्या पुंजक्याची
पडते केवढी सावली


अशी सुंदर बाग
येते रोज स्वप्नात
आई उठविते तेव्हा
होते नाहीशी क्षणांत

संपर्क : ९९६७१०४३९३

फार फार वर्षांपूर्वीची गोष्ट आहे आणि तीही अतिवृष्टीमुळे होणाऱ्या शेतकऱ्यांच्या नुकसानाची. आपल्याकडे आजदेखील अतिवृष्टीमुळे कित्येक शेतकऱ्यांच्या शेतात पाणी शिरून संपूर्ण पीक वाहून जाते आहे. अशा प्रकारे त्या काळी देखील काश्मीरच्या खोऱ्यात पर्वतावरून वाहत येणाऱ्या नदीच्या पाण्यामुळे हजारो एकर जमीन वाहून जात असे. शेतावरील बांध व उगवलेले पीक वाहून जाऊन सर्वांचेच अतोनात नुकसान होत असे. त्या वेळेस नगरातील तज्ज्ञ अशा व्यक्तीला बोलावून ह्या संकटातून मुक्त होण्यासाठी सर्वांनी प्रयत्न केले. पण व्यर्थ!

ह्या त्रासाला कंटाळून शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी विकल्या तर काहींनी अखेर त्या तशाच सोडून कुटुंबासह स्थलांतर केले. मात्र ही बाब राजाला शोभणारी नव्हती. त्याच्यासाठी ही लाजिरवाणी गोष्ट होती. वास्तविक पाहता प्रजेचे रक्षण करणे हे राजाचे आद्य कर्तव्य होते. पण तो ह्या बाबतीत अपयशी ठरला होता.

एहे दिवशी राजा असाच विचार करत बसला असता, प्रधानाने त्याच्यासमोर एक उपाय सुचवला. ‘जो कोणी काश्मीरच्या नगरावरचे पाण्याचे संकट दूर करून; हजारो नागरिकांचे होणारे नुकसान टाळून राजाला



संकटातून मुक्त करेल, त्याला तो मागेल तेवढी संपत्ती दिली जाईल, अशी दवंडी त्याने राज्यात पिटवायची. ह्यामुळे अनेक जण प्रयत्न करतील आणि कोणाला तरी याचा उपाय सुचेल आणि आपल्या राज्यावरचे संकट दूर होईल.' राजाला प्रधानाने मांडलेली ही कल्पना आवडली. दुसऱ्याच दिवशीच राजाने संपूर्ण नगरात दवंडी पिटवली. ''पर्वतावरून वाहत येणाऱ्या नद्यांचे पाणी थांबवून आमच्या नगरातील नागरिकांना व शेतकऱ्यांना जो संकटापासून वाचवेल त्याला अर्धे राज्य बक्षीस दिले जाईल.'' संपत्ती आणि राज्याच्या आमिषाने भल्या भल्या आणि हुशार विद्वानांनी प्रयत्न केले. पण त्यांच्या प्रयत्नांना यश प्राप्त झाले नाही. त्याच वेळी दूर असणाऱ्या नगरातील एक अडाणी वृद्ध गृहस्थ काश्मीरच्या नगरात आला आणि राजाला भेटला. त्या वृद्धाला पाहून सर्व जण हसू लागले. 'विद्वान मंडळींनी हात टेकले, मग हा म्हातारा काय दिवे लावणार' म्हणून त्याला खिजवू लागले. त्या वृद्ध माणसाने हजारो सुवर्ण मुद्रा राजाला मागितल्या. राजाला त्याच्यावर विश्वास तर नव्हताच तरी पण नगरात दवंडी दिल्यामुळे मुद्रा देणे भाग होते.




सुवर्ण मुद्रांनी भरलेल्या पिशव्या घेऊन तो उंच उंच असणाऱ्या पहाडावर चढला. तो कोठे तरी पळून जाईल म्हणून अनेक जण त्याचा पाठलाग करत होते, तर काही जण त्याच्याबरोबर होते. काश्मीर तसा उंच उंच पर्वतांचा प्रदेश होता. पर्वतातून अनेक नद्यांचा उगम होऊन मोठ्या वेगाने त्यांच्या पाण्याचा लोंढा खाली येऊन पूरस्थिती निर्माण होत असे.

तो वृद्ध गृहस्थ एका पर्वताच्या शिखरावर पोहोचला. तेथून राजाने दिलेली सोन्याची नाणी ओंजळ भरभरून पर्वताच्या मोठ्या मोठ्या खडकांच्या तळाशी तो टाकू लागला. सर्वांनी हा प्रकार पाहिला आणि सोन्याची नाणी गोळा करण्यासाठी नागरिकांनी ते खडक ढकलून बाजूला केले ढकललेले दगडी/धोंडे नदीपात्रात येऊन पडू लागल्याने नदीच्या प्रवाहाची दिशा बदलली आणि काश्मीरच्या पुराची समस्या कायमची मिटली. सुवर्णमुद्रांचे आमिष दाखवून त्या वृद्ध गृहस्थाने नगरातील सर्व नागरिकांना कामाला लावले आणि राज्यावरचे कायमचे पुराचे संकट दूर झाले. त्या वृद्धाच्या बुद्धीचातुर्यावर राजा खूश होऊन राजाने त्याचा बक्षीस देऊन सन्मान केला.

**संपर्क :** ९९७०५९५२८५

प्रसन्न दाभोलकर

# हनुमटीवरील वण



सातवीतली मनस्विनी ही एक आनंदी, उत्साही आणि तरतरीत मुलगी होती. नेहमी काही ना काहीतरी करत असायची. स्वस्थ बसणे तिला माहीतच नव्हते. सदैव पायाला भिंगरी लागलेली. तिची मावशी नेहमी म्हणायची, 'हिच्यापेक्षा तो वारा बरा गं बाई. निदान अधूनमधून तरी तो स्वस्थ बसलेला असतो.' परंतु याचा अर्थ मनू वेंधळी होती, ती सगळीकडे पसारा करून टाकायची असा नाही हं. तिच्यात नैसर्गिकरीत्या उत्साह नेहमी भरून वाहत असायचा, त्याला ती तरी काय करणार? तशी ती कोणती जबाबदारी टाळायची नाही. हाती घेतलेली गोष्ट अर्धवट सोडायची नाही. आपली दैनंदिन कामे वेळच्या वेळी पूर्ण करायची. मग तो गृहपाठ असो किंवा घरातले तिच्या वाटेचे काम असो. ते संपले की निघाली मैदानावर खेळायला. मैदान तिला खूप आवडायचे. तिचा बराच वेळ मैदानावर जायचा. सुदैवाने शाळा आणि शाळेचे मैदान तिच्या घरापासून जवळच होते. मग काय तिची मजाच मजा.

मनस्विनीचा सर्वात आवडता खेळ म्हणजे खोखो. खोखो म्हणजे तिचा जीव की प्राण. तिच्या शाळेतील सातवीच्या वर्गाची ती खोखोची कॅप्टन होती. मैदानावरील तिच्या चपळ हालचालींनी नेहमीच सर्वांचे लक्ष वेधले जायचे. पीटीच्या शिक्षिका नेहमी म्हणायच्या, ही आपल्या शाळेचे नाव काढणार बरं का. मनूचा  खेळ होतास तसाच चतुरस्र. पळती असो की धरती तिचा खेळ नेहमीच जसा वेगवान असायचा तसाच त्याच्यामागे तिचा काही विचार असायचा. समोरची खेळाडू आता काय करणार याचा अचूक अंदाज बांधून ती बरोबर तिच्यावर झेप घ्यायची आणि तिला टिपायची. पळतीच्या वेळीही तिची चपळाई आणि अचानक हूल देणे खोखोतील जाणत्या माणसांनाही अचंबित करायचे.

पण एका संध्याकाळी काही विपरीतच घडले. शाळा सुटल्यावर मैदानावर नेहमीप्रमाणे खोखोची प्रॅक्टिस सुरू होती. जीव तोडून मुली पळत होत्या. मनू खांबाजवळच्या मोक्याच्या जागी जय्यत तयारीत बसली होती. 'खो' मिळताच पटकन उठून, खांब धरून कलटी मारायची आणि पाठीमागची  बेसावध मुलगी टिपायची यात तिचा हातखंडा होता. त्या दिवशी काय झाले कोणास ठाऊक. अचानक तिचा पाय घसरला आणि ती जोरात खांबावर आदळली. तिची हनुवटी खांबावर आदळल्याचा मोठा आवाज झाला आणि ती कळवळून मटकन खालीच बसली. तिच्या हनुवटीला खोलवर खोक पडली होती. भळभळा रक्त वाहायला सुरुवात झाली. मुलींनी लगेच तिच्या हनुवटीवर रुमाल घट्ट दाबून धरला आणि तिचे शिक्षक तिला घरी घेऊन गेले. खूप रक्त येत होते, हनुवटी सुजली होती. पण मनू अजिबात घाबरली नव्हती. गावाकडे तिचे आजोबा होते. ते पूर्वी उत्तम कबड्डी खेळायचे. ते तिला नेहमी म्हणायचे, 'मनूताई देशी खेळ दणकून खेळायचे. यात आपण पडणार, लागणार हे होणार. इलाज करायचा आणि परत खेळायला सुरुवात करायची.'

मनूला लगेच दवाखान्यात नेण्यात आले. डॉक्टरकाकांनी तिला तपासले आणि ते म्हणाले, ''घाबरू नको मनू. खोक पडली आहे, आपण तीन टाके घेऊ आणि जखम शिवून टाकू.'' 'शिवून' हा शब्द ऐकताच त्या परिस्थितीतही मनस्विनी खुदकन हसली आणि डॉक्टरकाकांना म्हणाली, ''डॉक्टरकाका, तुम्हीही आईप्रमाणे शिवण करता वाटतं. माझे कपडे खेळताना फाटले की आई त्यांना टाके घालते.'' हसून डॉक्टर म्हणाले, ''बरोबर आहे तुझं. मीही एक प्रकारचा शिंपीच आहे. तुझ्या तुटलेल्या त्वचेला शिवणारा.'' अशा गप्पा मारता मारता डॉक्टरकाकांनी जखमेवर केव्हा टाके घातले ते तिला कळलेही नाही. जाता जाता तिने विचारले, ''डॉक्टरकाका तुमची फी?'' ते हसत म्हणाले, ''आपल्या शाळेला खो-खोची ढाल मिळवून द्यायची. तरच माझी फी मला मिळेल.'' ''नक्की!'' असे ओरडत मनस्विनी पळालीसुद्धा.

हळूहळू जखम पूर्णपणे भरली. डॉक्टरांनी टाके काढून टाकले. त्या प्रसंगाची खूण म्हणून मनूच्या हनुवटीवर एक आडवा व्रण मात्र उरला होता. पण मानस्विनीला त्याची काय पर्वा? तिचे नेहमीप्रमाणे पळणे, उड्या मारणे आणि मैदानावर जोरजोरात खोखो खेळणे केव्हाच सुरू झाले होते. आंतरशालेय स्पर्धा काही महिन्यांवर आल्या होत्या. शाळेत खोखोच्या स्पर्धेची तयारी मोठ्या उत्साहाने आणि जोरात सुरू होती. कोणती टीम निवडायची, पळतीला कोण,

धरतीला कोण, इतर शाळेच्या संघांबरोबर काय डावपेच लढवायचे याच्या चर्चा मुलींमध्ये आणि त्यांच्या शिक्षकांमध्ये सुरू झाल्या होत्या. मनस्विनीच्या शाळेच्या संघाकडे एक संभाव्य विजेता संघ म्हणून बघितले जाऊ लागले होते. परंतु काय झाले कोणास ठाऊक. हळूहळू मनूचा खळाळता उत्साह मंदमंद होत गेला.

मैदान म्हणजे जीव की प्राण असणारी मनू घरात जास्त घुटमळू लागली. शाळेतदेखील ती जरा नाराजीनेच जायची. तिचा अभ्यास आणि काम ती नेहमीप्रमाणे करायची परंतु त्यात पूर्वीसारखा तिचा जीव नसायचा. 'केले पाहिजे म्हणून केले' अशी तिची वृत्ती वाटायची. ती शांत शांत होत गेली. तिच्या चेहऱ्यावरचा उत्साह मावळत गेला आणि टपोऱ्या फुलासारखा असणारा तिचा चेहरा कोमेजू लागला. आई तिच्या आवडीचे तऱ्हेतऱ्हेचे पदार्थ करायची पण आता ती फक्त त्यांना उष्टावल्यासारखे करायची. तिची भूकही मंदावली होती. तिच्या आई-बाबांना काळजी वाटू लागली की 'आमचे हे उत्साही कोकरू अचानक असे घरकोंबड्यासारखे गप्प गप्प का झाले?' शेजारपाजारच्या आयाबाया कुजबुजू लागल्या, पोरीला दृष्ट लागली काय की. मनस्विनीच्या आई-बाबांनी शाळेत चौकशी केली. शिक्षकांनी सांगितले, 'शाळेत तिची काही तक्रार नाही. पण अलीकडे ती खोखोच्या प्रॅक्टिसला येत नाही. खेळाबाबत बोलत नाही. तिला बरे नाही का', असे विचारायला आम्हीच तुमच्याकडे येणार होतो.

तिच्यासाठी डॉक्टरांकडून टॉनिक आणले गेले. तरीही तिची भूक सुधारेना आणि उत्साह वाढेना. डॉक्टरकाकाही एकदा घरी येऊन तिला तपासून आणि तिच्याशी गप्पा मारून गेले. नेहमी त्यांच्याशी हसून बोलणारी आणि प्रश्न विचारून त्यांना भंडावून सोडणारी मनू आता मात्र अगदी मरगळली होती. तिच्या आई-वडिलांना एका बाजूला घेऊन डॉक्टर हळू आवाजात बोलू लागले, ''आपल्या मनूत काही शारीरिक दोष दिसत नाही. पण मनाने ती अगदी खचलेली वाटते. तिच्या मनाला धक्का लागण्यासारखे काही घडले होते का?'' बाबा म्हणाले, ''घरी तर सर्व नेहमीप्रमाणेच आहे. आम्ही शाळेत चौकशी केली. तिथेही काही झाले नव्हते.'' डॉक्टर म्हणाले, ''आपल्याला शोधून काढावे लागेल. तिच्या मनावरील दडपण निघून जाईपर्यंत ती पूर्वीसारखी हसरी होणार नाही.'' आता मात्र मनस्विनीचे आई-बाबा धास्तावले. काय केले म्हणजे आपले हे लाडके कोकरू परत पूर्वीसारखे टुणटुणीत होईल हे त्यांना कळेना.

आणि अचानक एके दिवशी मनूचे लाडके आजोबा त्यांच्याकडे काही दिवस राहायला आले. आजोबा आले की ती नेहमी उड्या मारायला सुरुवात करायची. त्यांची पिशवी उघडून शेतावरचा काय मेवा त्यांनी आणला आहे ते उचकटून बघायची. पण या वेळी तिने तसे काहीच केले नाही. आजोबांनी तिच्यासाठी तिच्या मामीने खास केलेले, तिच्या आवडीचे मुगाचे लाडू आणले होते. मनस्विनीला जवळ घेऊन ते म्हणाले, ''मनूताई, यावर्षी आपल्याला खोखोची ढाल मिळवायची आहे ना? मग खूप शक्ती पाहिजे. मामीने मुद्दाम तुझ्यासाठी हे मुगाचे लाडू बनवले आहेत. आपल्या कपिलाचे साजूक तूप घालून.'' त्या लाडवांना हात न लावताच मनू नुसतीच 'हं' असे म्हणाली आणि गप्प बसली. दरवाज्यात आशेने उभ्या असलेल्या आईने पदराने हळूच आपले डोळे टिपले.

आजोबाही जरा गंभीर झाले. इतर वेळा ते लेकीकडे तालुक्याच्या गावी आले की नेहमी दिवसभर आपल्या ओळखीच्या माणसांना भेटत फिरायचे. या वेळी मात्र ते घरात आणि घराच्या आसपास रेंगाळत होते. त्यांची नजर नेहमी त्यांच्या मनूताईभोवती भिरभिरत असायची. एकदा त्यांच्या नजरेस पडले, कधी आरशासमोर उभी न राहणारी मनस्विनी शाळेत जाण्याआधी बराच वेळ आरशासमोर उभी होती. वारंवार आपल्या हनुवटीकडे वेगवेगळ्या दिशांनी बघत होती. पुन्हा पुन्हा हनुवटीला पावडर लावत होती. हनुवटीवरील व्रणावरून हात फिरवून त्याला सारखे चाचपून बघत होती. शाळेत जातानाही ती आपली मान खाली घालून तो व्रण कुणाच्याही नजरेस पडणार नाही अशा प्रकारे बाहेर पडली. आजोबांना आपल्या डोक्यात काही प्रकाश पडत आहे असे वाटले, पण नेमके काय ते त्यांच्याही लक्षात येत नव्हते. काय करावे ते समजत नव्हते. दोन दिवसांनी पेपर वाचता वाचता ते अचानक आपल्या मुलीला म्हणाले, ''अगं, बऱ्याच दिवसांत गावातून चक्कर

मारली नाही. जरा वाचनालयापर्यंत फेरी मारून येतो.'' मुलीलाही जरा बरे वाटले.

संध्याकाळी मनस्विनी शाळेतून परत आल्यावर ते तिला जरा जबरदस्तीनेच आपल्याजवळ घेऊन बसले. ते हळूहळू बोलू लागले, ''मनूताई, या रविवारी आपल्याला एक गंमत करायची आहे बरं का. तुझ्यासाठी एक सरप्राईज आहे.'' इतर वेळी मनस्विनीने त्यांना, ''काय आजोबा? काय करायचे आहे? आत्ता मला सांगा.'' असा धोशा लावून भंडावून सोडले असते. आज मात्र खाली मान घालून ती फक्त 'बरं' म्हणाली. पण आजोबा गप्प बसले नाहीत. ते तिला पुढे सांगू लागले, ''लेफ्टनंट तेजस्विनी चौगुले हे नाव कदाचित तू ऐकले नसशील. त्या आपल्या तालुक्यातीलच आहेत. आर्मीमध्ये लेफ्टनंट म्हणजे अधिकारी आहेत. शेजारचे आपले शत्रू सीमेवर नेहमी छोटे-मोठे हल्ले करीत असतात हे तुला माहीत आहेच. अशाच एका हल्ल्यामध्ये त्यांच्या तुकडीने मोठे शौर्य गाजविले. स्वत: चौगुले यांनी मोठ्या धडाडीने तुकडीचे नेतृत्व केले. लढाईत त्यांच्या जवळच हातबॉम्ब फुटला. जखमांनी त्या रक्तबंबाळ झाल्या. तरीही न डगमगता त्यांनी शत्रूला पिटाळून लावले. त्यांच्या कर्तबगारीचा सन्मान म्हणून सैन्याने त्यांना मेडल दिले आहे. त्यामुळे या रविवारी त्यांचा गावात सत्कार आहे. त्याला आपण जाणार आहोत.'' कशीबशी मान हलवून मनस्विनीने तिथून आपली सुटका करून घेतली. आजोबा स्वतःशीच विचार करीत बसले.

रविवारी सभागृहात अखेर कार्यक्रम सुरू झाला. इतर व्यक्तींची भाषणे संपली. मग वेगवेगळ्या संस्थांकडून आणि गावांकडून सत्कारमूर्तीचा सत्कार करणे सुरू झाले. मनस्विनी नुसतीच शांत बसून होती. तिला कशातच रस वाटत नव्हता. अचानक आजोबांच्या गावाचे नाव पुकारले गेले आणि संयोजकांनी सांगितले की या गावातर्फे या गावचे माजी सरपंच आता सत्कार करतील. मनस्विनीचे आजोबा तिला घेऊन उठले आणि तिच्या हातात त्यांनी हार दिला. स्टेजवर जाऊन ते म्हणाले, ''माझ्या गावातर्फे आणि पंचक्रोशीतर्फे मी हार अर्पण करीत आहे. हा हार लेफ्टनंट चौगुले यांच्या गळ्यात माझी नात घालेल. तीही लेफ्टनंट चौगुले यांच्याप्रमाणेच शूर व्हावी असा आशीर्वाद त्यांनी तिला द्यावा अशी विनंती मी करतो.'' मनस्विनी जरा गोंधळूनच गेली. चौगुलेताईंचा हसरा चेहरा बघताच तिला जरा धीर आला आणि तिने हातातील हार पटकन त्यांच्या गळ्यात घातला आणि खाली वाकून त्यांना नमस्कार केला. तिला पोटाशी धरून ताई म्हणाल्या, ''शूर हो. मोठी हो.''

लेफ्टनंट तेजस्विनी चौगुले यांचे व्याख्यान सुरू झाले. पण आता मनस्विनी कंटाळलेली नव्हती. मान वर करून ती त्यांच्याकडे टक लावून बघत होती. कानात जीव गोळा करून त्यांचे शब्द ऐकत होती. चौगुलेताईंनी अतिशय सविस्तर आणि प्रेरणादायक व्याख्यान केले. सैन्यात जाण्याची इच्छा आपल्या मनात कशी निर्माण झाली, आपल्या मैत्रिणी आणि गावातल्या टवाळखोर लोकांनी आपली कशी टिंगल केली, त्यांच्या बोलण्याने मी कशी खचून गेले नाही, घरच्यांचा आणि शिक्षकांचा मला कसा पाठिंबा होता, सैन्यातील प्रशिक्षण कसे असते, तिथे किती कठोर परिश्रम करावे लागतात याचे सविस्तर वर्णन त्यांनी केले. आपल्या चेहऱ्यावरील आणि हातावरील व्रण दाखवून त्या म्हणाल्या, माझ्या शरीरावर अशा अनेक जखमा आहेत. या जखमांनी मी जवळजवळ अर्धमेली झाली होते. स्वतःचा जीव धोक्यात घालून माझ्या सहकाऱ्यांनी मला परत आणले म्हणून मी आज आपणा सर्वांसमोर ताठ मानेने उभी आहे. जय हिंद! भाषणानंतर टाळ्यांचा कडकडाट झाला. मनूदेखील टुणकन उभे राहून त्यांना शाळेत शिकवले होते त्याप्रमाणे शिस्तीत टाळ्या वाजवू लागली, 'एक-दोन; एक-दोन-तीन'. तिच्या टाळीचा तालबद्ध खणखणीत आवाज ऐकून आजोबांचे डोळे आनंदाने चकाकले.

कार्यक्रम संपला तेव्हा अंधार पडू लागला होता. परंतु आजोबा आणि नातीचे चेहरे काही वेगळ्याच तेजाने तळपत होते. आजोबांबरोबर कार्यक्रमाला गेलेली मनस्विनी आता पूर्णपणे बदलली होती. ताठ मानेने उड्या मारत, गाणी गुणगुणत, ती आजोबांच्या मागे पुढे धावत होती. वाटेत फुगेवाला दिसताच ती आजोबांना त्याच्याकडे ओढून घेऊन गेली आणि म्हणाली, ''सोनूला लाल फुगे खूप आवडतात. आपण

त्याच्यासाठी दोन फुगे घेऊ या. एक तुमच्याकडून, एक माझ्याकडून.'' घरी येताच तिने जाहीर केले, ''आई, खूप भूक लागली आहे. लवकर वाढ. हातपाय धुऊन येतेच.'' ''लाडकं गं माझं कोकरू ते! तुझ्या आवडीची दशमी, उसळ आणि अंड्याची पोळी मी आधीच करून ठेवली आहे!'' आई गहिवरून म्हणाली. रात्री आईच्या कुशीत शिरून झोपी जाताना मनू पुटपुटली, ''उद्या लवकर उठव गं. मला मैदानावर जायचं आहे. आजोबांनी सांगितलंय, यंदा ढाल मिळवायचीच.''

दुसऱ्या दिवशीपासून मनस्विनीचा पूर्वीप्रमाणे नित्यक्रम सुरू झाला. ती उत्साहाने बागडायला लागली, शाळेच्या गमती, मैदानावरील धमाल याबाबत गप्पा मारायला लागली. शिक्षकांना आणि आई-बाबांना वाटले, आपली मूळ मनू आपल्याला परत मिळाली. सारे जण खूश झाले. परंतु आजोबांना जरा रुखरुख वाटत होती. त्यांचे त्यांच्या मनूताईवर लांबून बारीक लक्ष होते. त्यांना आढळले होते की, ती अजून अधूनमधून आरशासमोर उभी राहते आणि हनुवटीवरील व्रणावरून हात फिरवत विचार करीत असते. तेही विचारात पडले. याच्या मुळाशी असलेल्या कारणाचा निचरा केल्याखेरीज आपली मनूताई परत शंभर टक्के पूर्वीसारखी झाली याची खात्री कशी देता येईल? इकडे आजोबांना घरी जायची घाई झाली होती. परंतु मनूचे मन मोकळे होण्याची जी संधी ते शोधत होते. त्याखेरीज त्यांचा पाय तिथून कसा बरे हलला असता?

शनिवारी संध्याकाळी ते मनूला घेऊन गावाबाहेरील हनुमानाच्या मंदिराकडे फिरायला गेले. मारुतीरायांना नमस्कार करताना आजोबांच्या डोक्यात एक कल्पना चमकली. मंदिराबाहेरच्या ओट्यावर बसून ते मनुताईशी गप्पा मारू लागले. त्यांनी विचारले, ''मनूताई, तुला माहीत आहे ना? हनुमान कशाचा देव आहे?'' ती उत्तरली, ''आजोबा, शक्तीचा! आणि बुद्धीचा पण'' आजोबा म्हणाले. ''माणसाला कोणतेही कार्य करायचे असेल तर शक्ती आणि बुद्धी या दोघांचीही आवश्यकता आहे हे आपण यांच्याकडून शिकतो. पण त्यांची हनुवटी अशी वाकडी कशामुळे झाली याची गोष्ट तुला माहीत आहे का?'' मनू पटकन उत्तरली, ''हो तर! तुम्हीच मला लहानपणी ती सांगितली आहे. बाल हनुमान सूर्याचा घास करायला निघाला तेव्हा इंद्राने त्याच्यावर वज्र टाकल्यामुळे.''

काही वेळ मनू गप्प-गप्प होती. नंतर आजोबांच्या मांडीवर डोके ठेवून ती बोलू लागली, ''कळलंय मला आजोबा, तुम्ही मला इथे का आणलं ते. आज मी तुम्हांला माझ्या हनुवटीची गोष्ट सांगते. ती मांडी घालून ताठ बसली आणि पुढे बोलू लागली, आजोबा, मी खोखो खेळताना पडले आणि माझ्या हनुवटीवर हा व्रण आला हे तुम्हांला ठाऊक आहेच. पण त्यापुढे शाळेत बऱ्याच गोष्टी झाल्या. शाळेतल्या माझ्या काही मैत्रिणी मला टाळायला लागल्या. माझ्याबद्दल कुजबुजायला लागल्या. एक तर सरळ मला म्हणाली, तुझ्या चेहऱ्यावर आता वण पडला आहे. तुझं आता काही चांगलं होणार नाही. तू कोणालाच आवडणार नाहीस. सुरुवातीला मी त्यांच्याकडे दुर्लक्ष केलं. पण नंतर त्यांनी माझ्याशी बोलणे आणि खेळणेदेखील बंद केले. सारख्या माझ्याकडे बघत कुजबुज करायच्या. मग मी त्याच विचारात पडू लागले. मनात सारखे तेच विचार घोळायचे आणि तेच मला खरे वाटू लागले. हळूहळू मला कशातच गंमत वाटेना.''

तिच्या डोळ्यांत पाणी तरारले होते. आजोबांनी मायेने तिच्या डोक्यावरून हात फिरवला. ते हळूच तिला म्हणाले, ''बरं झालं तू तुझं मन मोकळं केलस. अशा गोष्टी मनात दडवून ठेवल्या की त्या आपल्याला त्रास देत राहतात. व्रण ही किती अभिमानाची गोष्ट आहे हे तू तेजस्विनीताई आणि साक्षात मारुतीरायांकडून शिकली आहेस. आता स्वतःला कधी कमी लेखायचं नाही. आत्मविश्वासाने पुढं जायचं. या वर्षीची खोखोची ढाल नक्की मिळवायची. एक पक्कं लक्षात ठेवायचं. लोक चांगले बोलोत किंवा नावे ठेवोत, यश मिळो किंवा अपयश मिळो, आपण खचून जायचे नाही. आपली जिद्द कधी सोडायची नाही. ठेवशील ना हे पक्के लक्षात?'' आजोबांचे ही नेहमीचे आवडते वाक्य ऐकताच मनू मनापासून हसली आणि म्हणाली, ''नक्की लक्षात ठेवेन.'' पण न विसरण्याची काही युक्ती सांगा ना.'' ''हो मनूताई'' आजोबा म्हणाले आणि स्वतःशीच चोखोबांचा अभंग गुणगुणू लागले, ''ऊस डोंगा परी रस नोहे डोंगा, काय भुललासी वरलिया रंगा.''

**संपर्क : ९४२१११९२१७**

# या मायभूच्या मुलांनो

ज्ञानेश्वर शिंदे

या मायभूच्या मुलांनो फुलवा कळी मनाची
गुंफित विचारमाला सदैव महानतेची...

श्रद्धा विश्वास देती संदेश विजयाचा
त्रिकाल बोलबाला कर्तृत्व भावनेचा
हृदयी असू द्या निष्ठा त्या खंबीर टिळकांची

चढा शिखर तुम्ही कठीण त्या श्रमाचे
यश, धन, सफलता मार्ग आनंदाचे
फुलवा सकाळ हसरी सुगंधी आयुष्याची

जे चांगले जगी या त्याचा करा स्वीकार
सकलांच्या जीवनात आणा सुखाचा बहर
ती वाट चढणीची मानवाच्या कल्याणाची

आधार तुम्ही व्हावे रंजल्यागांजल्याचे
शिल्पकार तुम्ही व्हावे नव हिंदवी युगाचे
नीती अनुसरा रे त्या शीलवान शिवबाची

विचार शक्ती आहे विचार भक्ती आहे
मानवी सत्कर्माची विचार धार आहे
उठा मुलांनो कास धरा या थोर विचाराची

संपर्क : ९५६१२३९९०९



**अमित डहाणे**

# कुतूहल

‘किशोर’ मित्रांनो,
‘किशोर’ मार्च २०२४ च्या अंकातील कुतूहलची किती उत्तरे तुम्ही बरोबर दिलीत? या अंकात दिलेल्या उत्तरांशी आपण दिलेली उत्तरे ताडून पाहा. तुमच्यासाठी आणखी काही प्रश्न दिले आहेत. स्पर्धकांनी प्रश्नांची उत्तरे कोणाचीही मदत न घेता स्वतंत्रपणे लिहून पाठवण्याचे पथ्य काटेकोरपणे पाळावे. अचूक उत्तरे ‘किशोर’कडे २५ एप्रिल २०२४ पूर्वी अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवावीत किंवा ई-मेल करावा.

संपर्क : ९४२१०५०३८८

**१) आध्यात्मिक क्षेत्रात मानाचा समजला जाणारा ज्ञानोबा-तुकाराम पुरस्कार कोणास प्रदान करण्यात आला आहे?**
१) इंदुरीकर महाराज
२) बाबा महाराज सातारकर
३) डॉ. नारायण महाराज जाधव
४) वरील सर्वांना

**२) वय वर्षे १४ ते १९ या गटातील मुला – मुलींमध्ये जंतांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी कोणता दिवस ‘राष्ट्रीय जंतनाशक दिवस’ म्हणून घोषित करण्यात आला आहे ?**
१) १२ जानेवारी २ ) १७ सप्टेंबर
३) २५ डिसेंबर ४) १३ फेब्रुवारी

**३) नुकताच दक्षिण आफ्रिका येथे पार पडलेला ‘१९ वर्षाखालील क्रिकेट विश्वचषक’ कोणत्या देशाने पटकावला?**
१) भारत २) दक्षिण आफ्रिका
३) ऑस्ट्रेलिया ४) इंग्लंड

**४) २०२४ या वर्षी भारतात कितव्या लोकसभेसाठी निवडणुका होणार आहेत ?**
१) १८ व्या २) १७ व्या
३) १९ व्या ४) ७५ व्या

**५) देशाचे काळजीवाहू पंतप्रधानपद खालीलपैकी कोणी भूषवले ?**
१) पी.व्ही. नरसिंह राव
२) डॉ. मनमोहन सिंग
३) चौधरी चरणसिंग
४) लाल कृष्ण अडवाणी

**६) भारताच्या ‘हरितक्रांतीचे जनक’ कोणाला म्हटले जाते ?**
१) डॉ. स्वामिनाथन
२) डॉ. ए. पी.जे. अब्दुल कलाम
३) वर्गीस कुरियन
४) डॉ. नॉर्मन बोरलॉग

**७) खालील कोणता दिवस ‘राष्ट्रीय प्रथिने दिन’ म्हणून पाळण्यात येतो ?**
१) ५ सप्टेंबर २) १५ जून
३) २७ फेब्रुवारी ४) १५ मार्च

**८) महाराष्ट्र राज्यात पर्यटनाच्या दृष्टीने महत्त्वाचा असणारा कोणता महामार्ग उपक्रम सुरू होणार आहे?**
१) शक्तीपीठ मार्ग २) समृद्धी महामार्ग
३) एक्सप्रेस महामार्ग ४) भक्ती महामार्ग

**९) जगातील सर्वात अधिक मतदार कोणत्या देशात आहे?**
१) भारत २) अमेरिका
३) पाकिस्तान ४) ब्राझील

**१०) भारतातील पहिले ‘खासगी अवकाश प्रक्षेपण केंद्र’ कुठे उभारण्यात येणार आहे?**
१) चेन्नई २) नागपूर
३) मुंबई ४) अयोध्या

**११) कोणत्या राज्याने ‘समान नागरी कायदा’ पारित केला आहे.?**
१) उत्तर प्रदेश २) उत्तराखंड
३) बिहार ४) महाराष्ट्र

१२) 'Statue of Knowledge' **कोणाच्या स्मृतीनिमित्त उभारण्यात आला आहे?**

१) सरदार पटेल

२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर

३) वीर सावरकर

४) लोकमान्य टिळक

१३) **'मधाचे गाव' ही योजना कोणत्या राज्यात सुरू होणार आहे ?**

१) गुजरात २) महाराष्ट्र

३) आंध्र प्रदेश ४) मध्य प्रदेश

१४) **२०२४ साली जाहीर केलेल्या भारतरत्न पुरस्कारात खालीलपैकी कुणाचा समावेश नाही ?**

१) चौधरी चरणसिंग २) पी.व्ही.नरसिंगराव

३) कपिल देव ४) एम.एस.स्वामिनाथन

१५) **चंपाई सोरेन यांनी कोणत्या राज्याचे मुख्यमंत्री म्हणून शपथ घेतली ?**

१) दिल्ली २) तेलंगना

३) झारखंड ४) कर्नाटक

---

## मार्च २०२४ च्या चित्रकोड्याचे उत्तर




## कुतूहल (मार्च २०२४) ची उत्तरे

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १–२ | २–१ | ३–४ | ४–४ | ५–१ |
| ६–३ | ७–३ | ८–१ | ९–२ | १०–४ |
| ११–३ | १२–१ | १३–३ | १४–१ | १५–३ |

## कुतूहल फेब्रुवारी २०२४ यशस्वी स्पर्धक

**सातारा –** कु.सुवीर फडे

**मुंबई –** कु.आदिती जरळी

**सातारा –** कु.अहरोन माने

**सिंधुदुर्ग –** कु.ईश्वरी कांबळे, कु.राहुल कदम, कु.शंकर वेळणेकर, कु.जिनत शेख, कु.इयारअलवी सलमान, कु.वैभव शेलार, कु.गुलाम रसूल शरीफ मनाजी, कु.नावाज जैतापकर, कु.सोनाली तेली, कु.शमिका पोतकर, कु.जहिर मुजावर, कु.तमीम रमदूल, कु.गार्गी कदम

**कोल्हापूर –** कु.वैष्णवी यादव

## चित्रकोडे (फेब्रुवारी २०२४) यशस्वी स्पर्धक

**धाराशिव –** कु.शिवशंकर बसप्पा येलूरे

**वर्धा –** कु.चेतन मेंढुले, कु. स्वस्तिका चरडे,

**पुणे –** कु.अनुष्का वाळूंज, कु.सात्विका यादव, कु.संस्कार जगदाळे, कु.कुणाल वायभट, कु.गौरी कोठारी

**मुंबई –** कु.आदिती जरळी

**सातारा –** कु.सुवीर फडे, कु.अहरोन माने, कु.आदर्श अवघडे, कु.रुचिता चव्हाण, कु.परी पवार, कु.राधा पवार, कु.प्रतीक काळुगडे, कु.संतोष काळुगडे, कु.ध्रुव जगदाळे

**बुलढाणा –** कु.वैष्णवी धामोळे, कु.कृष्णा पेटकर, कु.नव्या ढगे, कु.साक्षी आजने, कु.भाग्यश्री उंबरकार, कु.अंजली राऊत, कु.श्रद्धा उन्हाळे, कु.गौरी गुळकरी, कु.भावना अजने, कु.सृष्टी चिंचोलकर, कु.कृष्णाली गावंडे,

**रत्नागिरी –** कु.सुमुख केतकर

**नांदेड –** कु.विराट गाठे, कु.संघर्ष गाठे,

**सांगली –** कु.धैर्यशील खोत, कु.शांभवी कुलकर्णी

**नागपूर –** कु.नीरजा कुलकर्णी, कु.राम सावंत

**सिंधुदुर्ग –** कु.ईश्वरी कांबळे, कु.राहुल कदम, कु.शंकर वेळणेकर, कु.जिनत शेख, कु.इयारअलवी सलमान, कु.वैभव शेलार, कु.गुलाम रसूल शरीफ मनाजी, कु.नवाज जैतापकर, कु.सोनाली तेली, कु.धनश्री धुरी, कु.अर्श रमदुल, कु.सुफयान मुजावर, कु.शमिका पोतकर, कु.जहिर मुजावर, कु.तमीम रमदूल, कु.गार्गी कदम, कु.अर्णव क्षीरसागर,

**कोल्हापूर –** कु.प्रांजल पाटील, कु.अथर्व कसबेकर, कु.ध्रुव कांदळगावकर

**लातूर –** कु.सार्थक तांदळे

**अकोला –** कु.सायली गावंडे

**सोलापूर –** कु.कल्याणी झाडबुके

# भावी आधारस्तंभ

माणूस जेव्हा एखादी चांगली गोष्ट करतो, तेव्हा आपण त्याला चांगला म्हणतो. अशा चांगल्या गोष्टी तुम्हीही नक्कीच केल्या असतील.

- तुम्ही दुसऱ्यांबद्दल आपुलकी आणि सहानुभूती दाखवता का?
- जे तुमच्यापेक्षा लहान आणि दुर्बल आहेत त्यांचे रक्षण करता का?
- ज्यांना मदतीची गरज आहे त्यांना मदतीचा हात देऊ करणे म्हणजे चांगुलपणा, असे तुम्हांलाही वाटते ना?

**मग लागा पाहू लिहायला. त्यासाठी सदर आहे – 'भावी आधारस्तंभ', तुम्हांला मानधन व वर्षभर अंक मिळेल. तुम्ही केलेल्या सत्कृत्याचा १० ते १५ ओळी मजकूर सुवाच्य अक्षरांत लिहा. तुमचे संपूर्ण नाव, पत्ता (पिनकोड नंबरसह), शाळेचे नाव, वय, इयत्ता इत्यादी तपशील द्या. पासपोर्ट आकाराचा फोटोही लावा. पाकिटावर रु.५/–चे तिकीट लावून अनुक्रमणिकेतील पत्रव्यवहाराच्या पत्त्यावर पाठवा.**



शाळा सुटल्यावर मी व माझ्या दोन बहिणी घरी जात होतो. तेवढ्यात दोघी बहिणी पळत सुटल्या. मी ओरडले तरी त्या थांबल्या नाहीत. एका बहिणीला जोराची ठेच लागली आणि ती रडू लागली. मी रस्त्यावरून त्या बहिणीला बाजूला घेतले. झालेली जखम पाहिली व जवळच असलेल्या दवाखान्यात घेऊन गेले. दवाखान्यात जखमेवर पट्टी बांधली व आम्ही घरी गेलो. आई शेतातून आल्यावर मी घडलेला प्रसंग सांगितला आणि आई दोघी बहिणींना ओरडली. रस्त्यात मधोमध पळत नसतात असे सांगितले. मी लगेच दवाखान्यात नेऊन उपचार केल्यामुळे आईने माझे कौतुक केले.

**कु. ईश्वरी धोंडीराम वर्दे**

जि.प.प्रा.शाळा काटगांव, ता. तुळजापूर, जि. धाराशिव–४१३६०३



माझे घर नदीच्या काठावर आहे. रोज आम्ही पाच मित्रमैत्रिणी नदीच्या काठावर खेळायला जातो. एक दिवस आम्ही नदीच्या काठावर खेळायला जात असताना तेव्हा मला एक कावळा दिसला. त्याला उडता येत नव्हते. त्याच्या पायाला जखम झाली होती. मग मी त्याला घरी नेले. घरी आणल्यानंतर मी त्याला पाणी पाजले, त्याची जखम स्वच्छ केली. त्याचा पायाला औषध लावले. मग मी हे सगळं मी माझ्या आईबाबांना सांगितले तर आईबाबांनी माझे कौतुक केले. मला खूप आनंद झाला.

**कु. सिद्धी गणेश तिरके**

इयत्ता ३ री, युग धर्म पब्लिक स्कूल, खामगाव,
जि. बुलडाणा ४४४३०३.



एहे  दिवशी मी माझ्या कुटुंबासोबत भवानी मंडप, कोल्हापूर येथे खरेदीसाठी गेले होते. जाताना वाटेत कमानीजवळ एक वयोवृद्ध आजोबा अतिशय रडवेल्या आवाजात येणाऱ्या-जाणाऱ्यांकडे काहीतरी खाण्यासाठी पैसे मागत होते. ''मी कालपासून उपाशी आहे, मला खूप भूक लागली आहे'' असे रडत रडत सांगत होते. त्यांची ती अवस्था बघून मला खूप वाईट वाटले. मी लगेच बाबांना म्हणाले की ''आपण त्या आजोबांना पैसे देऊया..'' पण बाबा म्हणाले ''पैसे देण्याऐवजी आपण त्यांना काहीतरी खायलाच आपण देऊया का?'' बाबांचा विचार मला पटला. मी बाबांकडून पैसे घेतले आणि खाऊ घेण्यासाठी दुकाने शोधू लागले. तिथे जवळच मला एक झुणका-भाकर केंद्र दिसले. तिथून झुणका भाकरी घेऊन त्या आजोबांनी आणून दिली. आजोबा खूप खूश झाले. त्यांनी त्यांनी लगेच भाकरी खायला सुरुवात केली. मला खूप समाधान वाटले.

**कु. सदिच्छा श्रीकांत टिपुगडे**

आरएसएन-१२२/बी-२/ए-११

श्री संयोग प्रतिराज गार्डन, फुलेवाडी रिंगरोड, कोल्हापूर ४१६०१०.



मी एकदा आजोळी गेले होते तेव्हा माझ्या मामा आणि मामीसोबत रक्तदान शिबिरात गेले होते. तेथे मामाने रक्तदान केले. नंतर घरी जाण्यासाठी निघालो. एक मुलगा रडत रडत आमच्याकडे आला व मला म्हणाला, ''मी माझ्या आई बरोबर आलो होतो. येथे खूप गर्दी आहे. म्हणून माझी आई मला दिसत नाही. मी हरवलो. मला फार भीती वाटली.''

मी त्याला म्हणाले ''घाबरू नकोस. आपण तुझ्या आईला शोधू या.'' मी मामाकडून फोन घेतला व त्या मुलाला विचारून त्याच्या आईचा नंबर लावला. त्याच्या आईने फोन उचलला, मी त्याच्या मुलाबद्दल सांगितले. त्यांना मी मेन गेटवर बोलावले. त्याला त्याच्या आई जवळ सोडून आम्ही घरी निघालो.

आई व मुलाची भेट करून दिली, मदत केली म्हणून त्याच्या आईने मला शाबासकी दिली.

मामी म्हणाली ''गुणांची गं माझी पोर''!

रस्त्यात मी काही बिस्किटचे पुडे गरीबांना वाटले. मनाला समाधान वाटले. अशा प्रकारे लोकांची मदत केली तर आपल्या अडचणीच्या वेळी देव आपल्यालाही मदत करतो.

**कु. तनुजा रमेश जैन**

इयत्ता ६ वी, १०'ड' राजेश्वर नगर, सलोनी अपार्टमेंट,

फेज-२, संतोषी माता गेम हॉल जवळ, भुसावळ, जि. जळगाव-४२५२०१

# उमलती प्रतिभा

## आलेख आहे हा मज प्यारा....!

आलेख आहे हा मज प्यारा
द आणि ध चा पसारा ...
चरण इथे आहेत चार
धन आणि ऋणचा मारा...!
पहिले चरण घेऊन येते
धन आणि धनाचे बहाणे....!
दुसऱ्या चरणामध्ये येतात
ऋण आणि धन हे शहाणे...!
किती सोपा आहे आलेख
यात आहेत फक्त चार चरणे...!
आलेख आहे हा मज प्यारा
द आणि ध चा पसारा ...
तिसऱ्या चरणामध्ये येतात
ऋण आणि ऋण हे पाहुणे...!
चौथे चरण दाखवते
धन आणि ऋण भार पाहणे....!
किती सोपा आहे आलेख
यात आहेत फक्त चार चरणे ...!
आलेख आहे हा मज प्यारा ...!

**कु. सृष्टी सोमनाथ निंभोरे**
इयत्ता ९वी,
लक्ष्मणराव आपटे प्रशाला,
पुणे ४११००४.



**रिद्धी दामोदर नारकर**
इयत्ता ७ वी, जि.प.पू. प्राथ. शाळा सौंदळ नं.३
ता.राजापूर, जि.रत्नागिरी-४१६७०४



**फरहत निसार अहमद इनामदार**
इयत्ता ८ वी(ब), सांगोला विद्यामंदिर प्रशाला,
ता.सांगोला, जि.सोलापूर-४१३३०७

# रामू शहाणा झाला

रामू नावाचा एक मुलगा होता. थोडाफार शिकलेला होता. पण त्याला वडील नव्हते. वडलांची खूप जमीन होती, काळीभोर सुपीक जमीन, बाराही महिने पाणी असणारी विहीर, मोठा चौसोपी वाडा, बैलजोडी, गुरंढोरं यात तो रमायचा. शहरात नोकरीसाठी न जाता आपल्या गावी तो आईसोबत राहत असे.दिवसभर शेतात काम करून दमला की आईच्या हातची भाकर खाऊन तृप्त होत असे. निर्व्यसनी, एकुलत्या एका बागायतदार या मुलासाठी मुलीही सांगून येत होत्या. सगळं कसं छान सुरू होतं.

गहू, बाजरी, मका या नेहमीच्या पिकांऐवजी तो हळूहळू केळी, बोरं, पपई या पिकांकडे हळूहळू वळला. त्याची बोरं पार सुरतपर्यंत जाऊ लागली. हातात बऱ्यापैकी पैसा खुळखुळू लागला. असाच एके दिवशी तो बोरांचा माल घेऊन विकण्यासाठी दुसऱ्या राज्यात गेला. मालाला भावही आला कारण टपोरी, रसरशीत बोरं लगेचच विकली गेली. पण पैशाची पिशवी घेऊन गाडीत बसताना गर्दीत कुणीतरी ती पिशवी चोरली. अर्थात गाडीतील प्रत्येकाची झडती घेतली जाऊनही चोर सापडला नाही कारण त्याने पिशवी आधीच साथीदाराला दिली असावी किंवा तो आधीच उतरून गेला असावा. मग पोलिसांकडे फिर्याद दिली.नशीब चांगलं की चोर मुद्देमालासह सापडला. त्याला त्याची पिशवी पैशासह परत मिळाली. त्याला खूप आनंद झाला. त्याने पोलिसांचे आभार मानले. साहेब म्हणाले, ''यापुढे रोख व्यवहार करू नकोस. ते धोक्याचे आहे. यापुढे चेकचा वापर कर किंवा मोबाईलवरील ॲपचा वापर करून आर्थिक व्यवहार कर. यात धोका कमी आहे. शिवाय व्यवहार हाताळणे सहज आणि सोपे आहे.'' रामू म्हणाला, ''आज मला चोरांनी चांगलीच अद्दल घडविली. तुम्ही योग्य दिशेने तपास केला म्हणून मला माझी रक्कम परत मिळाली. यापुढे मी सर्व व्यवहार चेकने आणि मोबाईल ॲपने करीन.'' आता रामू शहाणा झाला आहे.सगळे व्यवहार आता रोख रकमेशिवाय करतो.आता हुशार रामूला एक हुशार बायकोही मिळाली आहे.

अशी ही हुशार रामूची कथा.

**कु. हर्षदा दिनेश वाघ**
इयत्ता चौथी,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा-निकुंभे,
ता.जि.धुळे - ४२४३०९




कुणीतरी
आहे तिथं
घनश्याम देशमुख संपर्क : ९८२३४१३६२९
कुणीतरी आहे, म्हणजे कोण भूत, राक्षस की एलियन?
माहीत नाही, तू घरी चल. मला पुस्तके वाचायची आहे...
हे बघ नंदू, आता फक्त बारा वाजलेत, आपण त्या जंगलात जाऊ तो दगडी बंगला बघू अन् लगेच परत येऊन घरी जाऊ....
मग उद्या येऊ बाबाला विचारून...
मी आणलेली पुस्तके तुला हवी आहे ना?
हो! पण लवकर परत येऊ चल...
दोघेही हळहळू दरीत उतरले.
आणि त्या जंगलात गेले.
हे तर भरपूर सागाची झाडे आहेत आणि चंदनाची सुद्धा.


या जंगलात वाघ,
अस्वल असतील का रे?
असतील तर?
तुमच्या गावातील
लोकांनी बघितले
का? नाही ना अफवा
आहेत साऱ्या
पुढे गेल्यावर...
जंगलात हा
रस्ता कसा?
जुना असेल पण आता
या रस्त्यावरून कुणी
जात नाही.
जातात! हे बघ टायरचे निशान,
ट्रक लॉरी यांसारखी वाहने
जात असतील
या निशाणावरून कळतंय
मालवाहू ट्रक येतात
या जंगलात....
शू ऽऽऽ
आता
काय
झालं!
कुणी तरी
आहे तिथं...
क्रमशः

# बोकोबाची ऐशी तैशी

प्रा.डॉ.राजेंद्र झुंजारराव

बोकोबाला माठामध्ये
दिसले होते लोणी
खात होता जणू त्याला
पाहत नव्हते कोणी



लोण्यामध्ये त्याने थोडी
टाकली होती साखर
हट्ट करून मागत होता
गरम गरम भाकर



गरम गरम भाकर लोणी
चव होती छान
ताव मारत बोकोबाचे
सुरू होते गान

खाऊन झाल्यावर बोकोबाला
हवे होते पाणी
सुरूच होती अजून त्याची
म्याव म्याव गाणी



बोकोबाच्या गाण्याला
नव्हता नीट सूर
ऐकू येता प्राणी पक्षी
पळत होते दूर



बोकोबाला जाता येता
भीत होते सारे
रात्री त्याच्या डोळ्यात चमकत
आकाशातील तारे

संपर्क : ७७७४८९००५७






# Rhyme Time... Fun Prime

Archana Sambarkar

Rhyme Time....Fun Prime
Wake up early.....on time

Rhyme Time ...Fun Prime
Get ready..... in time

Rhyme Time....Fun Prime
Go to school.... in time

Rhyme Time....Fun Prime
Study hard .....on time

Rhyme Time...Fun Prime
Go to bed....in time

**Contact . : 7776091309**

# The Magic Book

Dr. Rasika V. Thosar

Meena was listening to this rhyme with her baby sister Nikita. She was always fascinated by the beautiful stars in the sky. Do they really look like diamonds? Do they shine a lot? Are they golden or silver? Her doubts were countless.At night, she kept on looking at the moon and the stars. While counting the stars, she drifted off to sleep in no time. Somebody was trying to wake her up at midnight. "Meena, Meena! I have got some beautiful stars for you" said the fairy with a sweet voice. Meena couldn't see anyone. A big golden basket of twinkling stars appeared in front of her. Meena wanted to touch the stars. But the fairy said, "You will get to touch the stars only if you help me."

"I would love to help you", said Meena sincerely.

"Will you please teach me how to read? I want to read so many stories from the beautiful colorful books. But I can't read a single sentence." said the anguished fairy.She was a tiny fairy wearing a frilled golden dress.

"Oh poor thing," thought Meena, this fairy is so sweet, I will definitely teach her how to read a book. It is not difficult at all. Anybody can read a book if taught



properly.

Fairy seemed to read her mind. "Thanks a lot Meena, I will practice a lot, I will be very sincere, I promise!" She said with delight.

Their classes began right away. Meena got some of Nikita's alphabet books and basic spelling books. She taught the fairy about consonants and vowels. She showed her some storybooks with lot of pictures.

They enjoyed reading together, it was real fun. After some time, Meena was hungry. Fairy gave her some star shaped cookies to eat.

"You are a star fairy. From today I am going to call you Starry!" giggled Meena.

"Starry!! I like the name." Said the fairy.

After reading a few more stories, it was time to sleep. Starry showed Meena a spacious star shaped bed with the softest pillows and mattress. It was the best day of her life.She slept peacefully with innumerable stars twinkling overhead.

On waking up, she was quite surprised to see herself in her own little bed. Her sister Nikita was laughing and playing, cooker was whistling in the kitchen. She shook her head, got up and splashed some water on her face. "What's happening?" She wondered aloud. "Where is my new friend Starry? I miss her already!"

She searched her room frantically. Checked in the living room, checked in the kitchen. She could not see her fairy friend anywhere.

Meena's mother asked her "What are you searching for?" Meena told her about the 'Starry' fairy. "It must have been a dream" told her mother. Meena was not ready to believe that.

After searching a lot, she just flopped down on the sofa, tired and sad. She noticed a new fairy tale book lying on the coffee table in front of her. It looked inviting. As soon as she opened the book, sparkling stars gathered together making a big 'thank you' on the front cover.

Meena could not believe her own eyes. "Starry!!" She whispered into the book and turned a page.

"Keep me with you and see the magic", out came a little sweet voice.

Excited, Meena shoved it in her backpack and ran downstairs to get ready for school.

"The real magic begins now!!" said the Book. Meena could not stop smiling.

She quickly walked to her classroom and sat beside her best friend.

Usual classes began. After lunch break, Meena heard surprised voices of her friends. She ran into the classroom to see what was happening. All the kids had sparkling story books in their hands. The stories were so good that they started reading immediately. The teachers were also astonished. Starry's voice boomed in the classroom,

*"Keep on reading, all my little buddies,*
*Do tell me your favourite stories*
*Keep on exchanging all these books*
*Come and see how it looks!"*


All the kids were jumping and shouting, Starry's magic spell had blessed them all. The joy of reading kept on growing in their school forever.


**Contact : 9970273841**

# Funny Puzzle

Ghanshyam Deshmukh

Draw a similar enlarged picture in the space given below.
Colour them.





How many leaves are there in the picture?



# चित्रकोडे

रचना - घनश्याम देशमुख

**हे चित्राचे शब्दकोडे आहे. यात चित्रांची नावे लपलेली आहेत. प्रत्येक चित्र बघून खालील चित्रकोडे पूर्ण करा.**




## सूचना

१) स्पर्धकांनी आपले नाव केवळ पाकिटावर न लिहिता कोडे सोडवले असेल त्या कागदावर लिहिणे आवश्यक आहे.

२) कोड्याचे उत्तर पाठवण्याची अंतिम तारीख २५ एप्रिल २०२४.

३) कोड्याचे उत्तर मे २०२४ च्या अंकात प्रसिद्ध होईल.

४) कोडे वेगळ्या कागदावर सोडवले तरी चालेल.

Registered R.N.I.NO. 22679/72

Kishor (Marathi) Postal Regd.No. PCW/076/2024-2026 Registered Newspapers posted at PUNE PSO, GPO- 411 001
The date of publication 26.03.2024 Posting on 27th & 28th March 2024
License to Post without prepayment of postage No. WPP-53












कथा, कविता, कादंबरिका, एकांकिका, दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र, विज्ञान, देश-देशांतर, लोककथा




लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर मासिकातील चाळीस वर्षांतील निवडक साहित्यांवर आधारित ‘निवडक किशोर’चे १४ खंड









किंमत प्रत्येकी ₹ १६३ /- (५०% सूट)






वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूण किंमत ₹ ११४१/-

किशोर

**If not delivered please return to :**
संपादक, ‘किशोर’ मासिक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व
अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग,
पुणे – ४११ ००४.
दूरध्वनी : ०२० – २५७१६२४४
ई–मेल : executive_editor_kishor@ebalbharati.in
वेबसाईट : www.kishor.ebalbharati.in

प्रति,